## प्रकरण दुसरें

# 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' मधील आशयसूत्रे

# प्रकरण दुसरे
# 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' मधील आशयसूत्रे

♦ प्रास्ताविक

**शेषराव मोहिते यांची वाङ्मयीन संपदा**

**शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनाची आशयसूत्रे**

**'असं जगणं तोलाचं' मधील आशयसूत्रे**

१. सावकारी ओझ्याखाली आलेले शेतकऱ्याचे जीवन

२. शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे

३. शेतकऱ्याचे कष्ट

४. शेतीवरील अस्मानी व सुलतानी संकट

५. शिक्षित तरुणाचे शेतीवरील प्रेम

६. धूर्त आणि भ्रष्टाचारी प्रशासन

७. शेतकऱ्याची होणारी फसवणूक

८. शेतकऱ्याच्या कुटुंबातील स्त्रीजीवन

**'धूळपेरणी' मधील आशयसूत्रे**

१. शिक्षित तरुणाची मानसिक घालमेल

२. शिक्षित तरुणाचे गावापासून तुटलेपण

३. शिक्षणव्यवस्थेमधील निरर्थकता

४. शेतीव्यवस्थेचे वास्तव

५. शिक्षित तरुणाचा संघर्ष

६. शिक्षित तरुणाचे शेतीविषयी प्रेम

७. शिक्षणामुळे झालेला बदल

**आशयसूत्रांचे वेगळेपण**

**आशयसूत्रांची वैशिष्ट्ये**

♦ समारोप

♦ संदर्भ ग्रंथ

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण दुसरे
# ‘असं जगणं तोलाचं’ व ‘धूळपेरणी’ मधील आशयसूत्रे

**प्रास्ताविक**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतामध्ये ७० ते ८० टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतीव्यवसायाकडे पाहिले जाते. शेतीव्यवसायाला जोडूनच पूरक व्यवसायही शेतकरी करु लागले. परंतु तरीही शेतीची व शेतकऱ्याची सुधारणा होऊ शकलेली नाही. सर्वांना अन्नधान्य पुरवणाऱ्या शेतकऱ्यावर आज उपासमारीची वेळ आलेली पहावयास मिळते. अनेक समस्यांच्या विळख्यात अडकलेला शेती व्यवसाय व शेतकरी मराठी साहित्यातून काही प्रमाणात चित्रित झालेला दिसतो.

महात्मा फुले यांच्या ‘शेतकऱ्याचा असूड’ या पुस्तकात शेतकरी जीवनाचे चित्रण आले होते. यानंतर त्यांचेच अनुयायी असणारे कृष्णराव भालेकर यांनी ‘बळीबा पाटील’ या कादंबरीतून इ.स. १८८८ मध्ये ग्रामीण जीवनाचे काही प्रमाणात चित्रण केले. तसेच धनुर्धारी यांनीही ‘पिराजी पाटील’ (१९०३) या कादंबरीतून शेतकरी जीवनाची वाताहात मांडली आहे.

साठोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांतून ग्रामीण वास्तवतेचे चित्रण केले जाऊ लागले. या कालखंडात अनेक तळागाळातील शेती कसणारे लेखक स्वत:चे अनुभव वाचकासमोर मांडू लागले. त्यामुळे या कादंबऱ्यातून अस्सल ग्रामीण जीवन चित्रित होऊ लागले. यातून शेतकऱ्यांच्या समस्या, कुटुंबपद्धती, शेती, बारा-बलुतेदारी, पिके, अनियमीत निसर्ग इत्यादी विषयांचा मागोवा घेतला जाऊ लागला. अशा लेखकांमध्ये शेषराव मोहिते यांचाही समावेश करावा लागतो. त्यांच्या ‘असं जगणं तोलाचं’ व ‘धूळपेरणी’ या कादंबऱ्यांमधील आशयसूत्रे प्रस्तुत

प्रकरणात अभ्यासावयाची आहेत. त्यापूर्वी शेषराव मोहिते यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख करुन घेता येईल.

**शेषराव मोहिते यांची वाङ्मयीन संपदा**

शेषराव माधवराव मोहिते यांनी मराठी कांदबरी लेखनामध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. १ ऑगस्ट १९५६ रोजी गेंटाळ (ता. उमरगा, जि.उस्मानाबाद) या खेडयात त्यांचा जन्म झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण बलसूर या गावी तर महाविद्यालयीन शिक्षण कृषीविद्यापीठ, परभणी येथे झाले. सध्या ते लातूर येथे कृषी महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय 'शेतकरी संघटनेचे' कार्यकर्ते म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील असतात.

शेषराव मोहिते यांनी 'असं जगणं तोलाचं' (१९९४) आणि 'धूळपेरणी' (२००१) या दोन कादंबऱ्या लिहिल्या. त्यांनी काही कविता आणि कथाही लिहिल्या आहेत. 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीला मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा ' वा. म. जोशी पुरस्कार', (१९९४), 'धि. ग. रोमारे' ग्रामीण साहित्य पुरस्कार, कोपरगाव, (१९९४), शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठान, औरंगाबाद यांचा 'शेतकरी साहित्य पुरस्कार', (१९९९) हे पुरस्कार मिळाले. तसेच 'धूळपेरणी' या दुसऱ्या कादंबरीला यशवंतराव दाते प्रतिष्ठान, वर्धा यांचा 'बाबा पदूमनजी पुरस्कार' (२००७), मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद यांचा 'नरहर कुरुंदकर पुरस्कार', (२००२), राज्यशासनाचा 'ह. ना. आपटे पुरस्कार', (२००२) असे विविध पुरस्कार मिळाले आहेत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनातील आशयसूत्रे अभ्यासावयाची आहेत.

**शेषराव मोहिते यांच्या कादंबरी लेखनाची आशयसूत्रे**

प्रत्येक कादंबरीमध्ये आशय हा असतोच. आशय हा कादंबरीचा गाभा असतो. एकवेळ कथानक विरहीत कादंबरी असू शकते परंतु आशयविरहीत

कादंबरीला पूर्णत्व येऊ शकत नाही. त्यामुळे आशय हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक ठरतो. कथानकातील समाजवास्तव आणि सांस्कृतिक विचारप्रणाली आशयसूत्राव्दारे प्रकट होत असते.

आशयसूत्र म्हणजे काय हे पहात असताना वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशामध्ये पुढीलप्रमाणे विवेचन आढळते. "एखादी स्थूल अथवा व्यापक विचार प्रणाली, कल्पना अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्व म्हणजे साहित्यकृतीचे आशयसूत्र. ते साहित्यकृतीतील सर्व घटकांना, तपशीलांना जोडणारे असते."[१] आशयसूत्रामध्ये विचारप्रणाली अनुभूती, आणि कल्पनेला महत्त्व असते. त्याबरोबरच साहित्यातील घटकांनाही तेवढेच महत्त्व असते. एकंदरीत, साहित्यातील कथानक, पात्रे, निवेदन, स्थळ, काळ, वातावरण, भाषा, शैली, घटना, प्रसंग इ. घटकांनी संघटीत केलेल्या आणि अर्थप्राप्त झालेल्या साहित्यकृतीच्या सूत्रालाच आशयसूत्र म्हणता येईल. मुळ आशयसूत्र जरी एकच असले तरी त्यातील आशयद्रव्याच्या घटकांच्या भिन्नतेमुळे विविध रुपबंध आकारास येत असतात. यानुषंगाने शेषराव मोहिते यांच्या 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' मधील आशयसूत्रे पुढीलप्रमाणे पाहता येतील.

**'असं जगणं तोलाचं' मधील आशयसूत्रे**

**१. सावकारी ओझ्याखाली आलेले शेतकऱ्याचे जीवन**

सुरुवातीपासूनच शेतकरी हा कर्जामध्ये अडकला गेलेला आहे. रात्रंदिवस शेतामध्ये काबाडकष्ट करुनही त्याचे कर्ज फिटत नाही. त्याचे संपूर्ण आयुष्य हे कर्ज फेडण्यातच खर्ची जाते. तरीही तो शेतातून उत्पादन काढण्यासाठी धडपड करीत असतो. त्याने पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतीतील खर्च वाढून हा शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला जातो.

शेतकऱ्याचे जीवन हे शेतीवरच अवलंबून असल्यामुळे एखादया पिकामध्ये निराशा झाली तरी तो तेवढ्यावर न थांबता नव्या उमेदीने दुसऱ्या पिकाच्या

तयारीला लागतो. त्यासाठी त्याला सावकाराकडून पुन्हा कर्ज घ्यावे लागते. शेतातून भरघोस उत्पादन काढून आपण घेतलेले सावकाराचे कर्ज परत करू ही त्याची अपेक्षा कधीच पूर्ण होत नाही. हे शेषराव मोहिते यांच्या या कादंबरीमध्ये आढळते.

या कादंबरीची सुरुवात कर्जबाजारी शेतकऱ्याच्या जीवनापासून होते. त्याचा जन्म, तारुण्य आणि मृत्युही कर्जातच होतो. हे वास्तव हरिबाच्या कुटुंबकथेतून साकारत जाते. हाणमू आणि नामू या दोन मुलांच्या लग्नासाठी दोनशे रुपये सावकाराकडून कर्ज घेतलेले असते. परतफेडीचा काळ संपल्यानंतर लगेच सावकाराचा तगादा सुरु होतो. सावकाराचा निरोप घेऊन नारायण बेरड हरिबाच्या घरी येतो. हरिबा जेवण करता-करता तोंडातला घास तोंडात आणि हातातला घास ताटात ठेऊन बाजूला काढून ठेवलेला रूमाल डोक्यावर ठेवतो. अनवानी पायानेच विष्णू कारभाऱ्याच्या घरी जातो. सावकार त्याला वायदयाची आठवण करुन देतो. तेव्हापासून हरिबा अस्वस्थ होऊ लागतो. ‘‘उद्या जर खरच ईष्णू कारबारी घरात घुसला. आन् चुलीत पाणी वतून, चुलीला पाये लावून बसला तर कसं करू. आज पातोर कितीतरी जनाच्या चुलीत त्येनं पाणी वतलाय.’’[२] या धास्तीने बसल्या जागीच त्याच्या मनाची घालमेल चालू होते. आजपर्यंत या सावकाराने अनेक कर्जदारांचे संसार बंद पाडलेले असतात. अनेकांच्या जमिनी बळकावलेल्या असतात. ती वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून हरिबा घाबरलेला असतो.

शेतकरी कर्जाच्या जाळ्यात अडकतो तेव्हा त्याला अनेक वेगवेगळ्या लोकांचे शहाणपण ऐकूण घ्यावे लागते. ज्याचे उभ्या जन्मात तोंडही पाहण्याची इच्छा नसते. तो विष्णू कारभाऱ्याच्या बैठकीतील चेंगट कोंडीबा देवराव महाराच्या मदतीने कोंडीत अडकलेल्या हरिबाच्या जमिनीवर डोळा ठेऊन असतो. तो कोंडीत अडकलेल्या हरिबाला जमिनीच्या सौदया संबंधी देवराव महाराच्या मदतीने विचारपूस करतो,‘‘मळयाची पट्टी तुमी मंचाल तेवड्याला घियाला राजी हायते बगा कोंडीबा सावकार’’[३] कोंडीबा सावकारच नाही तर अशा प्रकारचे अनेक लोक

कोंडीत सापडलेल्या हरिबासारख्या शेतकऱ्याचे लचके तोडण्यासाठी केव्हाही तयार असतात.

सावकारच्या कर्जामध्ये एकदा होरपळून निघालेल्या हरिबाला आता सावकाराकडून पुन्हा कर्ज काढण्याची इच्छा नसते. पण मुलांच्या लग्नासाठी नाइलाजाने म्हणून कर्ज काढावे लागते. सावकाराच्या माडीवर जात असताना त्याचे बळच निघून गेलेले असते. हे सांगताना निवेदक म्हणतो, "रस्त्यानं चालताना हारीबाचे पावलं झपझप पडत होते. पण माडीवर चढताना पायातलं सारं बळच निघून गेलं."[४] वायदा संपला म्हणून हरिबाला चावडीवर बोलावून विष्णू कारभारी, माणिकराव पाटील, कोंडीबा, केशव पाटील त्याचा पाणउतारा करून बोलतात. हरिबा या सर्वांचे बोलणे शांतपणाने खाली मान घालून ऐकूण घेतो. हाणमुला हे सारे बोलणे झोंबते. त्याला तर सारी चावडी गरगर फिरल्यासारखी वाटते. तीन गाड्या शेंगा विकूनही कर्ज कमी होत नाही. असा विचार मनामध्ये येऊन तो आत्महत्या करतो. नामू वयाने लहान असतो. त्यामुळे घरात कमावणारे कोणीही नसते. सावाकाराचा तगादा तर चालूच असतो. अशावेळी हरिबाच्या कुटुंबासाठी कोणीही धावून येत नाही. म्हणूनच त्याला अपल्या नातेवाईकांपेक्षा घरची जनावरे जवळची वाटतात. त्याला ही जनावरे म्हणजे घरातील नातेवाईक वाटू लागतात. त्यामुळे आपले दु:ख त्यांना सांगताना तो म्हणतो "आता तूमच्याशिवायी मला हातभार लावणारं कोण न्हाई राजानू ! तुमाला ठिवून तर आता मी काय करू तुमचा धनी व्हता, तो तर निगून गेला देवाघरी."[५] या कर्जाच्या पायातच हाणमुने आपला जीव गमावलेला असतो. नामुला या कर्जासाठी चाकरीला रहावे लागले. अशावेळी जवळचे आणि दूरचे कोणीही मदत करीत नाही. म्हणून आपली जिवापाड प्रेम करणारी जनावरेच त्याला जवळची वाटतात.

हाणमू कारभाऱ्याच्या कर्जाला कंटाळून आत्महत्या करतो परंतु हा आरोप हाणमुची सावत्र आई असणाऱ्या कासाबाईवर केला जातो. आमीनसाहेब गावात

चौकशीसाठी येतो आणि खिसा गरम करून निघून जातो. हा सर्व खर्च हरिबावर लादला जातो. त्यामुळे हरिबाचे कुटुंब पुन्हा कर्जाच्या फेऱ्यात अडकून पडते.

अशाप्रकारे शेतकऱ्याचे जीवन हे मरेपर्यंत सावकारी कर्जाच्या ओझ्याने दबून गेलेले असते. त्याचे आयुष्य संपले तरी कर्ज फिटत नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या पिढ्यान् पिढ्या या कर्जाच्या खाईत लोटल्या जातात. शेतकऱ्यावरील कर्ज हा एक शेतकऱ्याला लागलेला शापच आहे. शेषराव मोहिते यांनी 'सावकारी ओझ्याखाली आलेले शेतकऱ्याचे जीवन' या 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीत माडंले आहे.

**२. शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे**

शेतकरी कितीही कर्जबाजारी झाला तरी तो शेती कसण्याचे सोडत नाही. या कष्टाळू शेतकऱ्यावर अनेक स्वरूपाची संकटे येत असतात. तो या संकटाना कवटाळून न बसता आलेल्या संकटावर मात करून स्वाभिमानाने जीवन जगताना दिसतो. शेतकऱ्यावर कितीही कर्ज झाले तरी तो आपली इमानदार वृत्ती सोडत नाही. रात्रंदिवस एक करून तो कर्ज फेडण्यासाठी धडपड करीत असतो. यासाठी त्याचे पूर्ण आयुष्य गेले तरी त्याला त्याची फिकीर नसते. तो कोणाचीही लाचारी पत्करत नाही. एखाद्याच्या शेतामध्ये चाकरीला राहीन पण कोणापुढे हात पसरणार नाही. स्वत:च्या हिमतीवर तो कर्ज काढतो आणि फेडतोही. असे कष्टाळू 'शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे' शेषराव मोहिते यांच्या कादंबरीमध्ये चित्रित झाले आहे.

शेतकरी कर्जात अडकला तरी तो सहसा हताश होत नाही. कर्जासाठी स्थावर मालमत्ता विकण्याचा विचार मनात आणत नाही. म्हणजेच तो असेल तसे जीवन जगण्याचा आणि आलेल्या संकटाशी सामना करण्याचा प्रयत्न करीत असतो. अशाच स्वाभिमानी हरिबाला विष्णू कारभाऱ्याने घरी बोलवून घेतले आणि कर्ज घेताना केलेल्या वायद्याची आठवण करून देत फटकारले, तेव्हा हरिबा म्हणतो, ''याद हाय कारबारी मला बी. वायदा मोडून का बट्ट्रा लावून घियाचाय

जबानीला ... हेवडी बार माज्यावर भरवसा ठिवून बगा कारबारी. जबानीला खोट यिवू दियाचा न्हाई."[६] शेतकरी हा आपल्या दिल्या गेलेल्या जबानीला खोट येऊ देत नाही. दिलेला शब्द जर त्याच्याकडून नाही पाळला गेला तर आपल्या जबानीला बट्ट्रा लागेल अशी त्याची धारणा असते. कर्जाच्या परतफेडीसाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात आणि सावकार तर आता थांबायला तयार नाही. वायदा संपून बरेच दिवस होतात. त्यामुळे धूर्त सावकार या हरिबाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करतो. सावकाराचा हा डाव हरिबाच्या लक्षात येतो तेव्हा त्याच्यातीला अस्सल शेतकरी जागा होतो. तेव्हा तो देवराव महाराला म्हणतो, "देवराव! तू ज्येला आज सावकार मंतूस का न्हाई, त्या चेंगट कोंडीबाला जाऊन सांग. हामची खाणदान अशी बापजाद्याच्या जमिनी इकून खाणाऱ्यची न्हाई मनावं."[७] यावरून हरिबाचा सावकाराविषयीचा राग, चीड आणि शेतीविषयीची आस्था व्यक्त होते. शेतकऱ्यावर कितीही वाईट प्रसंग आला तरी तो आपली जिवापाड जपलेली काळी आई विकण्यास तयार होत नाही.

अशा शेतकरी कुटुंबातील पुरूष जेव्हा-जेव्हा संकटाला घाबरून पळ काढतात त्या-त्या वेळी या कुटुंबातील स्त्रिया अधिक जिद्दीने आलेल्या संकटाला सामोऱ्या जाताना दिसतात. त्यामुळेच हरिबा काही काळ घराबाहेर राहिल्यानंतर कुटुंबाची पूर्ण जबाबदारी एकट्या कासावर येऊन पडते तेव्हा कासा जिद्दीने कुटुंबाची जबाबदारी पार पाडताणा दिसते. जीवन जगण्यातही तिचा स्वाभिमान दिसून येतो. हरिबा घर सोडून गेल्यानंतर घरामध्ये पोटासाठी पुरेसे धान्यही नसते अशा परिस्थितीत ती भावाकडे जाण्याचा विचार करते. परंतु याठिकाणी तिचा स्वाभिमान आड येतो माहेरला जाण्याचा विचार ती बदलते. हे सांगताना ती म्हणते, "तित्तं तर जाऊन कुणाच्या दारात हुबारावं! ज्येला त्येला आपले आपले संसार जड झाल्यात. मोप पाटीवर पाय दिवून आल्याले भाऊ आसले तरी काय झालं! सारे मिळून व्हते, बाप व्हता, तवाची गोष्ट येगळी व्हती."[८] बायका, मुले यात

रमलेल्या भावांना एकटी बहीण असली तरी जड वाटणार या विचाराने कासा माहेरला जाण्याचा विचार सोडून देते.

मुलीच्या लग्नासाठी सोयरिक पाहण्यासाठी गेलेल्या हरिबाला त्यांचे घर, शेती सर्व काही पसंत पडते परंतु एवढी मोठी काळीभोर शेती असतानाही ही शेती कसण्यासाठी बैल–बारदना नाही याची खंत त्याला टोचत असते. म्हणून तो म्हणतो, 'पर बैल बारदान्याचा काय पत्ताच दिसेना रे मसा...' एका शेतकऱ्याला शेती कसण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बैलांविषयीची वाटणारी आपुलकी यातून व्यक्त होते. अशा शेतकऱ्यांना हे बैल म्हणजे कुटुंबातील एक प्रतिनिधीच वाटतात.

कर्जाच्या तगाद्यासाठी पदोपदी त्रास करणारा कारभारी स्वत:च्या नातीचा विवाह गोपाळ गुरूजी बरोबर करण्यासाठी विचारणा करतो तेव्हा हरिबा त्याला बेधडक नकार देतो. परंतु कासाला तो आपल्या मुलाचा बहुमानच वाटतो. म्हणून ती म्हणते, "आसना का तालेवार, त्येनं त्येच्या घरी लाख आसल! माजं लेकरू बी काय कमी न्हाई. हेच्या नवकरीला बगून एकांद्या वक्ताला त्येच्याबी तोंडाला पाणी सुटलं नसल कशावून?"[१] आपण शेतकरी कुटुंबातील असलो तरी काय झाल? आापला मुलगा शिक्षण घेऊन नोकरीला लागला याचा तिला आभिमान वाटत असतो. मोठमोठ्या घरची सोयरिक आपल्या मुलाला येतात याचा मोठेपणा तिला वाटत असतो तर हरिबाला मात्र पैशाने मोठी असणारी माणसे नकोशी वाटतात. त्याला पैशापेक्षा मनाने मोठी असणारी सोयरिक हवी असते. पैशापेक्षा माणुसकीला महत्त्व देणाऱ्या हरिबाच्या मनाचा मोठेपणा येथे दिसून येतो.

शेतकरी कुटुंबातील तरुण गोपाळ शिक्षण घेऊन नोकरीला लागतो. नोकरी करीत असतानाही तो आपली शेतीशी, कुटुंबाशी जोडली गेलेली मूळ नाळ तोडू शकत नाही. त्याचे शेतीवर कुटुंबावर अतोनात प्रेम असते. त्याला आपल्या कुटुंबाविषयी आभिमान असतो. त्यामुळेच तो आपल्या कुटुंबाला आणि त्यांनी केलेल्या कष्टाला कधीही विसरत नाही म्हणूनच तो म्हणतो, "काय बी झालं तर

ह्या भोळ्या भाबड्या भावाला आंतर दियाचं नाही. आज आपल्याला पंख आले मनून आपुण उडून गेलो तर घर कदीच वरी यियाचं नाही. हे घर वरी आणायचं. भावाच्या लेकरावाला बक्कळ शिकवायचं भावजईच्या ऋणातून थोडं तरी उतराई व्हायचं.''[१०] आपल्या घराला वर आणण्याची आदम्य इच्छा असणाऱ्या गोपाळची कुटुंबाविषयीची जाणीव, वत्सलभाव आणि मनाचा मोठेपणा येथे दिसून येतो.

गोपाळ मास्तर कष्ट करणाऱ्या आपल्या कुटुंबासाठी नवीन शेत घेतो, विहीर बांधतो, इंजिन खरेदी करतो आणि शेतीच्या प्रगतीसाठी अनेक प्रकारे प्रयत्न करतो. तालेवाराच्या घरातील शांताशी लग्न करूनही तो आपल्या गरीब कुटुंबाला विसरत नाही. उलट आपल्या कुटुंबाच्या स्वाभिमानी जगण्याचा आदर्श तिच्यासमोर ठेवतो. तसेच लहानपणापासूनच अलीशान घरात वाढलेली शांता गोपाळगुरूजींची बायको म्हणून शेतकरी कुटुंबात येते आणि पडेल ते काम स्वाभिमानाने करते. त्यामध्ये तिला कुठल्याही प्रकारचा कमीपणा वाटत नाही. यावरून गोपाळ आणि शांता यांचा आपल्या गरीब कुटुंबाविषयीचा स्वाभिमानच दिसून येतो.

अशाप्रकारे रात्रंदिवस शेतात कष्ट करणारा, दुष्काळी कामावर जाणारा शेतकरी पेरणी करतो पण अनियमीत पावसामुळे शेतामध्ये पिकधारणा होत नाही. तरीही हा शेतकरी खचून न जाता, नव्या उमेदीने पुढील पिकाच्या तयारीला लागतो. यावरून त्याच्या जगण्यातील स्वाभिमान दिसून येतो. शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे शेषराव मोहिते यांनी 'अस जगनं तोलाचं' या कादंबरीतून मांडले आहे.

### ३. शेतकऱ्याचे कष्ट

शेषराव मोहिते यांच्या कांदबरीमध्ये 'शेतकऱ्याचे कष्ट' हे आशयसूत्र आढळते. या आशयसूत्राच्या माध्यमातून लेखकाने शेतकऱ्यांचे जीवन आणि कष्ट वाचकासमोर मांडले आहे. या कष्टाच्या बदल्यात शेतीतून त्याला किती मोबदला मिळतो, याचा जणू एक आराखडाच येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकरी

कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिला या कष्टाचे चटके सहन करावे लागतात. वर्षभर कष्ट करूनही मिळालेले उत्पादन नगन्य स्वरूपाचे असते. त्यामुळे शेतकरी कर्जाच्या भोवऱ्यात अडकला जातो. त्यातच निसर्गाचाही त्याच्यावर सतत कोप होत राहतो. मोठ-मोठे दुष्काळ पडतात. अशा परिस्थितीत गावोगाव दुष्काळी कामे निघतात. त्यामध्ये खडी फोडणे, माती उचलणे, नाला बंडींग करणे इत्यादी कष्टाची कामे त्याला करावी लागतात.

शेषराव मोहिते यांच्या कांदबरीमध्ये अशा स्वरुपाचे कष्ट आले आहे. अशा या शेतकऱ्याला शेतामध्ये रात्रंदिवस काबाडकष्ट करावे लागते. त्याची कष्टाची सोबत आज तागायत संपलेली नाही. तो या कष्टाच्या बळावरच शेती पिकवत असतो. हा शेतकरी आर्थिक दृष्टिने कमकुवत असला तरी तो कष्टाच्या बाबतीत कधीच मागे हटताना दिसत नाही. कष्ट हेच त्याचे भांडवल असते. एवढे कष्ट करूनही या शेतकऱ्याच्या पदरात अपयशच पडते. त्यामुळे तो निराश होतो. हरिबा बिरादर हा रात्रंदिवस शेतात राबूनही अपयशी ठरलेला शेतकरी आहे. या अपयशामूळेच तो शेतातून, घरापासून पळ काढून पांडुरंगाच्या वाऱ्या करु लागतो. त्यामुळे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी कासाबाईवर येऊन पडते. या ठिकाणी 'धग' या कादंबरीतील 'कौतिक' या व्यक्तिरेखेचा आवर्जून उल्लेख करता येतो. नवरा अकार्यक्षम असतानाही स्वत: कष्ट करून आपल्या नवऱ्याबरोबरच, संपूर्ण कुटुंबाचा गाढा कौतिक जिद्दीने चालवते. तिची जीवन जगण्याची जिद्द ही सर्वसामान्य माणसाला प्रेरणादाई ठरताना दिसते. अगदी त्याचप्रमाणे ही कासाबाई संसारापासून पळ काढणाऱ्या नवऱ्याबरोबर जिद्दीने संसार करते. 'धग' मधील कौतिक, 'झोंबी' मधील तारा, 'पाचोळया' तील पारबती तशी 'असं जगणं तोलाचं' मधील कासाबाई ! ही त्यांच्याच नात्यागोत्यातील पुरुषाच्या निष्क्रीयतेला बळी ठरलेली स्त्री आहे. कासाबाईबरोबर सतत शेतामध्ये कष्ट करणारी आणि सुरुवातीला बरेच दिवस नवऱ्याचा सहवास न लाभलेली धुरपा तर शांता, ही श्रीमंत घरातील मुलगी

गोपाळशी लग्न करुन सासरी गरिबीत समाधानाने राहते आणि मुकाटयाने दु:ख सोसते. अशा शेतकरी कुटुंबातील स्त्रियांना कृषिप्रधान संस्कृती मध्ये कष्ट उपसावे लागते.

शेतकरी कुटुंबातील पुरुष आणि स्त्रियांबरोबरच त्यांच्या मुलांना, जनावरांना आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या सर्वच घटकांना या कष्टाचे डोंगर उचलावे लागतात. त्यामुळेच हरिबाचा थोरला मुलगा हाणमू रात्रंदिवस शेतामध्ये उन्हाळपाळया घालत असतो. कुणबीकीची सर्व मशागत तो एकटाच आपल्या भरत्या आणि सुरत्या या दोन बैलांच्या मदतीने करीत असतो. हाणमुप्रमाणेच या दोन बैलांनाही सतत शेतामध्ये राबावे लागते. याचे दु:खही कधी कधी हाणमुला होत असते. तसेच सावकाराच्या कर्जासाठी नामुला दुसऱ्याच्या शेतामध्ये चाकरीला रहावे लागते, तेथे पडेल ते काम मुकपणाने करावे लागते.

ग्रामीण भागामध्ये अशी काही कुटुंब असतात की, ज्यांना स्वत:चे घरही नसते आणि शेतीही नसते. अशा कुटुंबांना कष्ट केल्याशिवाय एकवेळची भाकरी देखिल मिळत नसते. त्यांना रोज नित्य-नियमाने मोलमजूरी करावी लागते, अन्यथा त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते. म्हादा आणि रुखमा हे कुटुंबही अशाच प्रकारचे जीवन जगत असते. हे दोघेही कामासाठी नामू बिरादराच्या विहीरीवर जातात. खोल विहीरीमध्ये उतरुन स्वत:च्या जीवाला धोका पत्करुन हे मजूर कष्ट करतात. विहिरीचे काम चालू असतानाचा एक प्रसंग कादंबरीत चित्रित झालेला पहावयास मिळतो. " चौघं मिळून रोज साताठ-साताठ सुरुंग घ्यायचे. निघालेला आजुरा नामू आन् म्हादा टोपल्यात भरुन द्यायचे. धुरपा रुकमा भरलेले टोपले वरी नेऊन टाकायच्या."[११] यावरून शेतकरी आणि मजूराला किती जीवावर बेतून कामे करावी लागतात हे समजते. खोल विहिरीमध्ये जाऊन सुंरुग भरणे आणि तो फोडणे, त्यानंतर निघालेले पाषाणाचे मोठ-मोठे दगड डोक्यावर ठेऊन वर आणणे असे अत्यंत धोकादायक काम शेतमजूरांना करावे लागते.

शेतकरी कुंटुबातील स्त्रीलाही अनेक कष्टाची कामे करावी लागतात. ही कामे करीत असताना तिच्या आजारीपणाचाही विचार केला जात नाही. हे सांगताना लेखक म्हणतात. "शांताला सहावा महिना लागलेला. तिनं तसच आजुऱ्याचे टोपले घेऊन चालली की नामूला अवघडल्यावनी वाटायचं."[१२] शांता अवघडलेली असतानाही ती खोल विहिरीमध्ये उतरुन मोठ-मोठे दगड टोपल्यात भरुन वर आणते. त्यामुळे तिच्या पोटामध्ये वाढत असलेल्या लहान मुलाला धोका पोचण्याची शक्यता असते. तरीही ती स्त्री हा धोका पत्करुन कष्ट करताना दिसते. शांता ही शेतकरी कुटुंबातील एक प्रातिनिधीक स्त्री म्हणून येते. परंतु अशा शेतकरी कुटुंबातील अनेक स्त्रियांना जीवावर बेतून कष्ट करावे लागते.

सर्वत्र दुष्काळ पडल्यानंतर शेतीची कामे बंद होतात आणि खास दुष्काळी म्हणून शासनाची कामे चालू होतात. या कामामध्ये कामकगाराला राबवून घेतले जाते आणि त्या मोबदल्यात कमी पगार दिला जातो. शेती करणारा शेतकरीही खडी फोडण्यासाठी जातो. यापूर्वी कधीही खडी फोडायची माहिती नसणाऱ्या शेतकऱ्याला खडी फोडून हाताला जखमा होतात. त्यामुळे आलेले सर्व पैसे दवाखाण्यासाठी खर्च होतात. असाच हा शिबीर परबू नावाचा शेतकरी दुष्काळामुळे खडी फोडण्यासाठी जातो. तेव्हा त्याचे झालेले हाल तो स्व:च सांगतो, " ही दुस्काळ लागलाय न्हवं हात धिवून. खालतं वरतं कायी सुदरू दियना झालाय. हेवका, कदी बाप जल्मी म्हायती न्हाई आसले कामं करावं लागलालं!"[१३] असे म्हणून तो दोन्ही हात पुढे करतो दोन्ही हातावर खडी फोडून फोड येऊन फुटलेले आणि त्याच्या जखमा झालेल्या दिसतात.

अशा स्वरुपाचे अतिशय भीषण आणि जीव धोक्यात घालून शेतकरी आणि मजूर यांना कष्ट करावे लागते. याचे वास्तव लेखकाने या कांदबरीमधून वाचकासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४. शेतीवरील अस्मानी व सुलतानी संकट

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. भारतातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही आजही शेतीवर अवलंबून आहे. परंतु तेवढया प्रमाणात ती या लोकंसख्येला सामावून घेऊ शकलेली नाही. शेतीचे दरडोई उत्पादन लोकंसख्येच्या तुलनेत फारच कमी आहे. शेतीमध्ये सतत पीक धारणा केली गेल्याने तिच्यातील सुपीकता कमी झाली आहे. शेती सतत ओलीताखाली आल्यामुळे ती क्षारयुक्त होऊ लागली आहे. त्यामुळे शेतीव्यवसाय हा संकटात सापडलेला व्यवसाय ठरू लागला. अशा स्वरूपाच्या संकटाबरोबरच अनेक वेगवेगळया प्रकारची संकटे शेतीवर ओढावलेली असतात. त्यामध्ये काही निसर्गनिर्मीत तर काही संकटे ही मानवनिर्मीत असतात. यातील निसर्गनिर्मीत संकटावर आजतागायत कोणालाही मात करता आलेली नाही. याच्या तुलनेत मात्र मानवनिर्मीत संकटाना आळा घातला जाऊ शकतो. यामुळेच एकेकाळी पुढे असणारा शेतीव्यवसाय आज शेवटच्या क्रमांकावर गेला आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये शेषराव मोहिते यांनी या आशयसूत्राच्या माध्यमातून वाचक, समाजासमोर शेतीव्यवस्थेचे वास्तव मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याठिकाणी त्यांनी मानवनिर्मीत तर काही निसर्गनिर्मीत संकटाचा मागोवा घेतलेला आहे.

या कादंबरीतील हरिबा हा कर्जबाजारी शेतकरी आहे. तो शेतामध्ये काबाडकष्ट करतो. पण त्याला कधीही यश आलेले नाही. उलट तो अनेक संकटाच्या खाईत अडकत जातो. त्यातच सावकाराचा तगादा त्याला झोप येऊ देत नाही. हा सावकार हरिबाची जमीन बळकावण्याच्या विचारात असतो. त्यामुळे हरिबाला हा सावकार म्हणजे आपल्या शेतीवरील एक प्रकारचे संकटच वाटू लागते. या सावकाराने अशा पद्धतीने अनेक शेतकऱ्यांना फसवून जमिनी बळकावलेल्या असतात. लेखकाने सावकाराचे हे गुण त्याच्याच तोंडून येथे वदवलेले आहेत. ‘‘जा की तू आता जा. पण पळूण पळूण कुटंवर पळणारायस! शेवटाला तेवडा मळ्याचा

दिड एकराचा तुकडा माज्या हावाली कर मंजी झालं. मला दुसरं कायीच नको.''[१४] अशी सावकाराची कूट नीती शेतकऱ्याच्या शेतीवरील मोठे संकट ठरते. या कर्जाचा फटका शेतकऱ्याच्या कुटुंबातील प्रत्येक घटकाला बसत असते. शेतकऱ्याला प्रत्येकक्षणी साथ देणारे बैल-बारदाना विकल्यानंतर शेतकऱ्यावरती एक प्रकारचे अरिष्टच ओढावले जाते. बैल-बारदाना नसेल तर शेतीची मशागत होऊ शकत नाही आणि मशागत योग्यरीत्या नाही झाली तर जमिनमध्ये चांगल्या प्रतीचे पीक येऊ शकत नाही. हे सांगताना लेखकाने नामुकरवी त्याच्या मनातील खंत येथे व्यक्त केली आहे, ''उद्या त्यांचेच बिरडे सोडावं. पुढे कुणबीकीचं कसं होईल? आतापातोर कुणबीक आपल्या खाणदानीत कुणी मोडलं न्हवतं. आज्ज्याच्या वक्ताला बारा बैलांचा बारदाना. गावात मोक्यावरला वाडा. वरचीवर उतरती कळाच लागत गेली आणि आज व्हता न्हवता तेवढा बारदाना मोडायची पाळी आली. घरात चार खाते तोंडं. उद्या हया कच्च्याबच्च्याचं कसं व्हईल!''[१५] म्हणुन नामुचा हात थरथर कापू लागतो.

निसर्गाचा कोप कसा होईल हे सांगता येत नाही त्यामुळेच कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडत असतो. पावसाळा तोंडावर आला तरी पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी हवालदील होतो. तो सतत वरुणराजाची याचना करीत असतो. तर कधी ओला दुष्काळ पडतो आणि आलेल्या सर्व पिकाची नासाडी करुण जातो. निसर्गाच्या या अनियमीतपणाविषयी सांगताना निवेदक म्हणतो, ''मिरुग निघाला. सारं गाव पावसाची वाट बघत होतं. दिवस मावळायला सारं गाव तोंड बारीक करून सायबाच्या कट्ट्यावर जमायचं. नामुही तिथच एक कोपरं धरुन लोकांचं बोलण ऐकत बसायचा. कुणीतरी म्हणायचं, आज महालींग रायाच्या माळाकडं पावशा आरडला.''[१६] एवढे ऐकूणच माणसे खुश होत होती. पण पाऊस काही पडत नाही.

निसर्गाच्या या अनियमीतेमुळे येणारे प्रत्येक वर्ष तसेच निघून जाते. शेतकरी मात्र येणाऱ्या वर्षासाठी सर्व तयारी करुन सज्ज असायचा पण त्याची निराशाच होत

चालली. हे सांगताना नामू म्हणतो, ''तसं न्हव गा राजाराम मामा, हि दिवसं आसले. दरसालाला गेल्याला सालच बरा मनायची पाळी. किती बी केलं तर पोटापाण्याला बराबर''[१७] त्यामुळे येणाऱ्या नवीन वर्षावर आता विसंबून राहण्यापेक्षा मागील वर्षाच चांगले होते असेल म्हणण्याची वेळ येते.

पूर्वी शेतकऱ्याच्या मुलाचे लग्न जमवत असताना त्याची जमीनजुमला पाहूनच सोयरिक जमवली जात असे. त्याला नोकरी असली तरीही जमीन असलीच पाहिजे असा अलिखीत नियमच असे. कालांतराने शेतीवरील संकटांमुळे शेतीव्यवसाय धोक्यात आला. त्यामुळे नोकरीला अधिक महत्त्व प्राप्त झाले. शेती नसली तरी चालेल पण नोकरी पाहिजेच असे एक नवे समीकरण तयार झाले. त्यामुळे गोपाळची सोयरिक जमवायला आलेला पाहुणा म्हणतो, ''शेतं बाडी बगायला तित्तं हायच काय? सारं बगिटल्यालच हाय की. आन् हामी पोराला बगून दिवलालाव परगी. त्येच्या शेताबाडीला बगून थोडच दिवलालाव!''[१८]

शेतामध्ये कधी उत्पादन चांगल्या प्रतीचे येते तेव्हा त्याला योग्य भाव मिळत नाही तर कधी बाजारभाव चांगला असतो तेव्हा शेतकऱ्यांकडे पीक नसते. कधी कधी सुरुवातीला पीक चांगले येते. परंतु पाण्याअभावी ते जळून जाते. तर काही वेळा पिकाचे उत्पादन होते अशावेळी त्याची मागणी घटलेली असते. गोपाळ गुरुजींनी शेतामध्ये ऊस लावला आणि तो पोसलाही चांगला परंतु नेमके त्याचवर्षी ऊसाचे मुबलक्र ऊत्पादन झाल्यामुळे कारखान्याने ऊस गळतीस नेण्यास नकार दिला म्हणून उभा ऊस जाळून टाकण्याची वेळ या शेतकऱ्यावर येते. अशा घटनांमुळे शेतकऱ्याचे मोठया प्रमाणावर नुकसान होते. त्यातच शासनाचा शेतकऱ्याकडे पाहण्याचा संकूचित दृष्टिकोन यामुळे हा शेतकरी कर्जबाजारी होतो. या अनेकविध संकटांमुळेच हा शेतीव्यवसाय रसातळाला चाललेला पहावयास मिळत आहे.

अशा प्रकारे शेषराव मोहिते यांनी या कादंबरीतून शेतीजीवन आणि शेतकरी यांच्या समस्यांचे दर्शन घडविले आहे. या माध्यमातून त्यांनी 'शेतीवरील अस्मानी व सुलतानी संकटांचे' चित्र रेखाटले आहे.

## ५. शिक्षित तरुणाचे शेतीवरील प्रेम

शेतकरी कुटुंबातील एखादा तरुण शिकूण, विद्याविभूषित होऊन नोकरीला लागतो. तरीही तो आपल्या घरापासून, शेतीपासून, फारकत घेऊ शकत नाही. त्याची तेवढी नाळ तेथील शेतीशी, संस्कृतीशी एकवटलेली असते. ती तो तोडू शकत नाही. शिक्षण आणि नोकरी या दोन्ही वेळी त्याचे नागरी जीवनाशी संबंध येतात. परंतु तरीही हा तरुण आपली भाषा, संस्कृती जपताना दिसतो. आपल्या कुटुंबाची, परिस्थितीची जाण त्याला असते. याचे वास्तव शेषराव मोहिते यांच्या या कांदबरीतून पहावयास मिळते.

गोपाळ हा या कुटुंबातील पहिलाच शिक्षित तरुण असतो. तो शिक्षण घेऊन आपल्या कुटुंबाशी आणि शेतीशी घट्ट बांधला गेलेला आहे. म्हणूनच तो घराची मोडखळीस आलेली घडी आपल्या शिक्षणाच्या आणि नोकरीच्या बळावर पुन्हा उभी करतो. मिळालेला पगार तो आपल्या कुटुंबासाठी आणि शेतीसाठी खर्च करतो. शेतीमध्ये आधुनिकता आणण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. तो आपल्या कुटुंबाला कधीही विसरत नाही. त्यामुळे घरातील एक सुशिक्षित व्यक्ती म्हणून सर्व कुटुंब त्याच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करते.

शेतामध्ये ऊस लावण्यासाठी गोपाळ प्रयत्न करतो. ऊसापासून मिळालेल्या उत्पादनातून शेतीचा खर्च निघाला नाही, म्हणून देणेकऱ्याचे देणे तसेच राहते. गोपाळ नामुवर रागावतो. संयमशील, समंजश वृत्ती असणारा गोपाळ काही काळानंतर थोरल्या भावाची माफी मागतो. त्याला आपल्या बोलण्याचा पश्चाताप होतो. तेव्हा तो म्हणतो, ‘‘आबा! त्या दिवशी मी रागाच्या भरात जी कायी बोललो त्येचं तुला, वैनीला लई वाईट वाटलं आसल. पण किती केलं तरी मी धाकटा. माझा राग तुम्ही दोघंही मनावर घेऊ नका.’’[१९] यावरुन शेतकरी कुटुंबातील तरुण शिकूण कितीही मोठा झाला तरी तो आपली मान-मर्यादा विसरत नाही. तसेच तो आपल्या कुटुंबाशी एकनिष्ठ आणि मनमिळावू वृत्तीने राहतो याचे प्रत्यंतर या कादंबरीत येते.

आपल्या नोकरीपेक्षा शेतीची प्रगती करुनच आपले कुटुंब पुढे येऊ शकते अशी त्याची धारणा असते. म्हणून शेती सुधरावयाची असेल तर पारंपरिक पद्धतीने शेती न करता व्यवसायिक तत्वावर शेती केली पाहिजे, त्यासाठी त्याला आर्थिक स्थैर्य महत्त्वाचे वाटते. म्हणून गोपाळ श्रीरामाला मोठा डॉक्टर करण्याचे स्वप्न पाहत असतो.

एकंदरीत, शेतकरी कुटुंबातील तरुण शिक्षण घेऊन नोकरी करीत असतानाही ग्रामीण जीवनाशी, शेतीशी, आणि आपल्या गरीब असणाऱ्या कुटुंबाशी कसा एकनिष्ट राहतो याचे वास्तव लेखकाने या कादंबरीत मांडले आहे. यातून त्याचे शेतीवरील प्रेमच व्यक्त होते.

### ६. धूर्त आणि भ्रष्टाचारी प्रशासन

भ्रष्टाचारी प्रशासनाचा सर्वात मोठा फटका बसतो तो शेतकऱ्याला. देशातील या भ्रष्टाचारी शासनव्यवस्थेमुळेच आज देशाची जागतिक पातळीवर आर्थिक कुचंबना होताना दिसत आहे. आज आपल्या देशामध्ये अतिशय मोठया प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला दिसतो. संपूर्ण देश हा या भ्रष्टाचाराने पोखरला गेला आहे. त्यामूळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा माणला गेलेला शेती व्यवसाय धोक्यात येऊ लागला आहे. हे वास्तव शेषराव मोहिते यांच्या कादंबरीतील हा महत्त्वपूर्ण आशयसूत्रामध्ये दिसून येते.

हरिबाचा थोरला मुलगा हाणमू कारभाऱ्याच्या कर्जाला कंटाळून आत्महत्या करतो. पण कारभारी आपल्यावरील संकट निवारण्यासाठी त्याच्याच सावत्र आईने त्याचा आफू चारुन घात केला असे सांगतो. त्यासाठी तो गावातील पोलिस पाटलाला लाच देऊन फितूर करतो. त्यामुळे गावाचा न्याय करणारा पोलिस पाटीलही भ्रष्ट बुद्धीने कारभाऱ्याला साथ देतो. तो तालुक्याच्या ठिकाणी जाऊन हरिबाच्या विरुद्ध केस दाखल करतो. त्यामुळे काही काळात मोहरीरसाहेब गावात येतो. हरिबा, तुकाराम आणि बळी यांना दम टाकून बोलतो. या दमाला घाबरून

तुकाराम आणि बळी जे खरे आहेत ते सांगून जातात. त्यामुळे कारभारी आणि पोलिस पाटील यांचा डाव उलटा होतो. म्हणून ते ही केस मिटवण्याच्या मागे लागतात. पण मोहरीरसाहेब आता ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. हे पाहून केशव पाटील त्याला चारशे रु. दयायचे कबूल करतात. तेव्हा मोहरीर केस मिटवण्यास तयार होतो. हे सांगताना केशव पाटील म्हणतात, " आठ दिवसात चारशे रुपय भरती करुन आणून दी हारीबा. सायब चारशावर राजी झाल्यात."[२०] यावरुन मोहरीरसाहेबाच्या भ्रष्ट स्वभावाचे दर्शन घडते.

गावामध्ये मुलांना शिकविण्यासाठी व्यवस्थित शाळा नाही म्हणून आष्टेकर गुरुजी पुढाकार घेऊन गावातून वर्गणी करुन शाळा बांधण्याचे निश्चित करतात. त्यासाठी गावचे सरपंच रंगराव पाटील यांची मदत घेतात. जमा झालेला सर्व निधी गुरुजी सरपंचाकडे सुपूर्द करतात. होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वत:कडे ठेवतात. शाळेचे बांधकाम पूर्ण होऊनही काही रक्कम शिल्लक राहिलेली असते. ही रक्कम सरपंच आपल्या शेतीच्या कामासाठी खर्च करतात. म्हणून आष्टेकर गुरुजी त्यांना हिशोब मागतात. अशावेळी सरपंच त्यांना मारहान करुन ती रक्कम स्वत:च्या खिशात टाकतात. गुरुजींना मारत असतानाच सरपंच म्हणतो, "तुला हिशोब फायजी व्हय रे तुजी भईण? पुरी झाला का दिवू दी आजून?"[२१] यातून सरपंचाची भ्रष्टाचारी वृत्तीच दिसून येते.

धुरपाला विहिरीचे काम करताना जखम होते म्हणून नामू दवाखाण्यात घेऊन जातो. अज्ञानी नामू रूग्णाला लवकर तपासणीसाठी घ्या म्हणून विनंती करतो. तेव्हा तो कर्मचारी त्याचा अवमान करतो, "आरं ये पटक्या. हित्तं कुणीच जिजावून जास्त झाल्याशिवायी येत नसल्यात. सगळे पार शेवटच्या घटकला लागले की मगच येत्यात हित्तं. तूच लई नवसाचा लागून गेलास का. चल फिर म्हागारी."[२२] असे म्हणणारा तोच कर्मचारी एखाद्याने त्याला लाच दिल्यानंतर सर्व नंबर तोडून रूग्णाला डॉक्टरजवळ घेऊन जातो.

एकंदरीत असे म्हणता येईल की, या समाजव्यवस्थेमध्ये सर्वच थरांमध्ये हा भ्रष्टाचार मोटया प्रमाणात पहावयास मिळत आहे. या सर्वाचा मोठा परिणाम शेतकऱ्यावर होतो. त्यामुळेच भ्रष्टाचारी शासनव्यवस्थेचा सर्वात मोठा परिणाम शेतकऱ्याला भोगावा लागतो, याचे दर्शन शेषराव मोहिते यांच्या कांदबरीत होते.

**७. शेतकऱ्याची होणारी फसवणूक**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. अशा कृषीप्रधान देशातील शेतकऱ्याची अनेक स्थरावर मोठया प्रमाणात फसवणूक होताना दिसते. शेतकरी हा अशिक्षित असल्यामुळे अनेक कार्यालयामध्ये त्याची अवहेलना केली जाते. शेतकऱ्याचे काम असल्यामुळे कोणत्याही कामाला गती दिली जात नाही. शासनाची कोणतीही योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचू दिली जात नाही. शेषराव मोहिते यांच्या कादंबरीत हे आशयसूत्र पहावयास मिळते.

या कादंबरीतील हरिबा बिरादर या शेतकऱ्याची अनेक ठिकाणी फसवणूक होताना दिसते. त्यामुळेच सावकाराला हरिबाकडून पैशाच्या बदल्यात जमीन लुबाडायची असते. त्यासाठी तो हरिबाला कर्जाचा सतत तगादा लावतो. जेणेकरुन हरिबा कटांळून तो जमिनीचा तुकडा स्वत: होऊन देईल. यासाठी तो हरिबाची फसवणूक करताना दिसतो.

विष्णू कारभाऱ्याच्या कर्जाला कंटाळून हाणमू आत्महत्या करतो. पण धूर्त कारभारी स्वत:वरील संकट कासावर ढकलून तिच्यावर हाणमुच्या मुत्युचा आरोप ठेवतो. त्यासाठी हरिबाच्या दोन पुनण्यांचा फसवूण वापर करतो. त्यांना हरिबाच्या विरोधात जबानी देण्यास भाग पाडतो. त्यामुळे या कारभाऱ्याकडून हरिबाची आणि एकूणच कुटुंबाची मोठया प्रमाणात फसवणूक झालेली दिसून येते.

सावकाराप्रमाणेच गावचा पोलिसपाटीलही हरिबाची फसवणूक करतो. तुकाराम आणि बळी दोन्ही हरिबाचे पूतने पण पैशासाठी लाचारी पत्करून सत्य

दडवून ठेऊन आपल्या सख्या चुलत्याला फसवण्याच्या कटात सामील होतात. त्यामुळे आपल्या घरातील व्यक्तिकडून हरिबाची फसवणूक होते.

नामुने शेतात ऊस लावलेला असतो. ऊस चांगला येतो. पण गावात संबा जाधवाचे एकच गुऱ्हाळ असते. तेही अद्याप चालू झालेले नसते. नामुने त्याला विचारले असता चालू झाले की तूमचाच ऊस सुरूवातीला गाळू असे तो म्हणतो. पण गुऱ्हाळ चालू झाले तेव्हा तो म्हणतो, "आरं नामा, आसा का हातघाईला आल्यावनी करलालास मनावं. घरचा घाणा गाळायचं ठिवून. दुसऱ्याचे थळं गाळू देत्यात व्हय पोरं!"[२३] शेतकरीच शेतकऱ्याची कशा पध्दतीने फसवणूक करतो याचे प्रत्यंतर यावरून येते.

शेतकऱ्याने पिकविलेला माल बाजारामध्ये काडीमोल किंमतीला विकावा लागतो. याठिकाणी दलाल, व्यापारी यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याची लूट केली जाते. हे सांगताना निवेदक म्हणतो, "घोळका गुळाजवळ आला. त्यातले कायीजण बुटाचे पाये घेऊन डागावर चढले. ते नामूला बघावं वाटना. आपल्यालाच कुणीतरी पाडून छातीवर बुटाचे पाये देऊन नाचलालय वाटलालं. कायी जण हातातले मोळे डागात खुपसायचे. बाहेर आलेला गूळ हातात घेऊन बी ना बघताच पायदळी टाकून द्यायचे."[२४] अशा पध्दतीने वर्षभर शेतात कष्ट करून पिकवलेल्या शेतकऱ्याच्या मालाची किंमत केली जाते. नामुने आडतीवर नेलेल्या १० ते २० गुळाचे डाग विकण्यापूर्वीच पायदळी तुडवून नास झाले होते आणि राहिलेला गुळ व्यापाऱ्यांनी काडीमोल किंमतीला विकल्यामुळे त्यातून दलाल आणि आडतीवाल्याच्या कमीशनलाही तो कमी पडतो.

अशा प्रकारे व्यापारी, दलाल, शासन, शेतकरी या सर्वांकडून शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणार फसवणूक होते. शेतकरी आहोरात्र कष्ट करून शेती पिकवतो परंतु त्या पिकाला योग्य बाजारभाव मिळत नाही. अशा शेतकऱ्याला सर्वच स्थरावर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याची सर्वत्र कुचंबनाच होत असते, हे या कादंबरीतून दिसून येते.

## ८. शेतकऱ्याच्या कुटुंबातील स्त्रीजीवन

शेतकरी कुटुंबातील पुरूष ज्यावेळी अधिक कार्यक्षम असतात तेव्हा स्त्रिया अकार्यक्षम, निष्क्रीय असतात. परंतु याठिकाणची परिस्थिती ही याच्या विरूध्द आहे. या कादंबरीतील कर्तापुरूष हरिबा यास त्याच्या संपूर्ण आयुष्यामध्ये कधीही यश येत नाही. त्यामुळे तो संसारापासून पळ काढू लागतो. हरिबा भजन, कीर्तन, टाळ यांच्या सान्निध्यात अधिक वेळ घालवू लागतो. अशावेळी कुटुंबाची जबाबदारी आणि कष्ट उपसावे लागते ते त्याच्या स्त्रीला. हे सांगताना भास्कर चंदनशिव म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या प्रापंचिक अपयशाने करून दिलेली पायवाट तशी नवी नाहो. आजही या कुणबीकीचा बारदाना बायकांच्या गळ्यात टाकून, या पायवाटांना अनेक 'वाटा' फुटल्याचे दिसते. दारू, जुगार आणि गावराजकारण हेही पर्याय दिसून येतात. शेवटी शेतीचा खतेरा उपसावा लागतो, तो असंख्य कासाबाईसारख्या स्त्रियांनाच!...''[२५] आजही असे काही शेतकरी आहेत की, स्वत:ला ते शेतकरी म्हणून मिरवत असतात. पण प्रत्यक्षपणे ते शेतात कधी राबत नाहीत. प्रत्यक्ष शेतामध्ये मात्र त्याची पत्नी राबत असते. हा शेतकरी फक्त बांधावरून फिरत असतो. तो शेतीचे सर्व कष्ट स्त्रियांकडून करून घेऊन स्वत: दारू, जुगार, रंडीबाजी करण्यातच दंग असतो. याचा सर्वात जास्त त्रास हा कासाबाईसारख्या स्त्रियांना सहन करावा लागतो.

अशा कष्टाळू स्त्रियांचे दर्शन या कादंबरीमध्ये होते. कासाबाई, धुरपा, शांता, हिरकणा, कस्तुरा या स्त्रिया कुणबीकीत रात्रंदिवस राबताना दिसतात. यावरून असे म्हणता येईल की, दारिद्र्य भोगणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या वाट्याला सर्वात अधिक दु:ख येते. सोशिकता आणि कष्टाळूपण हा स्त्रियांचा स्वभावधर्म असतो. वाईट प्रसंगामूळे व संकटामूळे ज्यावेळी घरातील पुरूष खचून जातो. तेव्हा या स्त्रिया धैर्याने पुढे येतात. परिस्थितीशी, संकटाशी सामना द्यायला सिध्द होतात. याचे उत्तम उदाहरण म्हणून कासाबाई व धुरपाकडे पाहता येईल.

स्वत:च्याच मुलाच्या हत्येचा आरोप आणि पोलिसांचा बोलवा याला घाबरून हरिबा घरातून पळ काढतो. कधी पंढरपूर तर कधी भाचीकडे राहतो. तेव्हा कासाबाईवर सर्व जबाबदारी आणि दु:खही येऊन कोसळते. हे सांगताना ती आपल्या आईच्या गळ्यात पडून रडताना म्हणते, "माय ऽऽऽ तुला काय सांगू येऽऽ माजा वनवास! भाड्यानं आपल्या हातानं आपला घात करून घेटला. पण माज्या लेकराबाळाला दिवस आंटला. गावात मला तोंड दाकवायला जागा ठिवलानी. त्येला घालूनच मारायचं ऱ्हायलं आसतं माज्या मनात, तर तवाच मारून घाटले असते. पण हितके दिवस संबाळ करून बी शेवटाला माज्यावरच आळ घालून गेला..."[२६] सावत्र आई असूनही ती हाणमूला सावत्रपण जाणवू देत नाही. त्याला लहानाचे मोठे करते सख्या आईपेक्षा जास्त प्रेम देते. तरीही त्याच्या मृत्युचा आरोप तिच्यावर येतो तेव्हा ती गर्भगळीत होते. तिच्यावर दु:खाचा डोंगर कोसळतो. असे असले तरी यामुळे ती खचून न जाता आलेल्या संकटाला धैर्याने सामोरे जाते.

कासा आक्काप्रमाणेच संसार करणारी तिची सून म्हणून धुरपा येते. नामूला ती पसंत नसल्यामुळे बरेच दिवस तिची तो अवहेलना करतो आणि काही काळानंतर सलगीने राहू लागतो. यावरून असे दिसते की, स्त्री आणि पुरूष यांची तुलना करता स्त्रीच्या कोणत्याही मताचा किंवा विचाराचा, तिच्या आवडीनिवडीचा विचार करण्यास वाव दिला जात नाही. तिला पुरूषाच्या विचारानूसार व आवडीनूसार वागावे लागते. याठिकाणी पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व गाजवणारी संस्कृती समोर येते. नामू स्वत:च्या इच्छेनूसार आपल्या पत्नीचा एक स्त्री म्हणून वापर करीत असतो. त्यामुळे धुरपाचा जीव कोंडून गेलेला असतो.

शांता ही कासाबाईची दुसरी सून. ही तालेवार घरातील मुलगी सून म्हणून या कुटुंबात येते, गोपाळला नोकरी असूनही तो तिला नोकरीच्या ठिकाणी घेऊन जात नाही. तो तिला सासरी घरातल्या व्यक्तिंबरोबर शेतात कामासाठी पाठवतो.

शांता हे सर्व मुकपणाने सहन करीत असते. यासंदर्भात लिहीताना वासूदेव मुलाटे म्हणतात, “ग्रामीण माणूस हा शहरी संस्कृतीचा शोषित असला तरी त्याच्या घरातली स्त्री ही तेथील पुरूषप्रधान संस्कृतीमधील शोषितांची शोषित आहे. ग्रामीण पुरूष कष्टाळू असला तरी स्वत:च्या स्त्रीच्या बाबतीत मात्र त्याचे वागणे शोषकासारखेच आहे.”[२७] यावरून असे म्हणता येईल की ग्रामीण माणूस हा शहरी संस्कृतीचा शोषित बनला आहे आणि ग्रामीण स्त्री ही ग्रामीण पुरूषप्रधान संस्कृतीची शोषित आहे.

ग्रामीण जीवन जगत असताना शेतकऱ्याच्या वाट्याला अनेक संकटे येतात. अनेक प्रसंगाशी सामना करावा लागतो. एकंदरीत विचार केला तर असे दिसते की शेतकरी कुटुंबातील पुरूषांपेक्षा स्त्रिया ह्या अधिक सहनशीलता असणाऱ्या आणि आलेल्या संकटाला न घाबरता सामोरे जाताना दिसतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणचे बिरादर कुटुंबातील धुरपा. विहीर खोदत असताना पाषाण लागले तरी पाणी काही लागत नाही म्हणून बिरादर कुटुंब हवालदिल होते. पण धुरपा धीर सोडत नाही. ती आपल्या कुटुंबाला धीर देताना म्हणते, “उटलं का सुटलं आसं का बोलणं यिवलालय मनावं तुमच्या तोंडाला. आता व्हणाऱ्या गोष्टी का आपल्या हातच्या हायत्या? पर मनून आवसान घातक्यावनी कसं बोलावं!... आन् पाषाणाकडं बगून आसं छाती फोडून घेटल्यावनी का करलालाव तुमी? जाणते माणसं तर पाषाणतच पाणी लई ऱ्हातय मंत्यात.”[२८] कुटुंबातील अपयशामुळे ढासळत चालल्लेल्या मानसिकतेला आधार देणारी स्त्री म्हणून या ठिकाणी धुरपा येते.

एकंदरीत, स्त्री ही पुरूषप्रधान संस्कृतीची, समाजाची शोषित आहे. तिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून कष्ट तर करावे लागते पण अन्य बाबतीत पुरूषांप्रमाणे सर्वच अधिकार तिला दिले जात नाहीत. त्यामुळे तिचे सर्वच पातळीवर शोषण होताना दिसते पण हीच स्त्री कुटुंबप्रमुख या नात्याने आपली

महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. याचे चित्र 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीत पहावयास मिळते.

## 'धूळपेरणी'मधील आशयसूत्रे

### १. शिक्षित तरूणाची मानसिक घालमेल

पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन विद्याविभूषीत झालेला श्रीराम हा एका शेतकरी कुटुंबातील शेतकऱ्याचा मुलगा असतो. तो कृषीविद्यापीठाची पदवी घेतो. शेतीविषयक शिक्षण घेऊन शेती सुधारण्याची त्याची महत्त्वाकांक्षा असते. पण तसे होत नाही. उलट कृषीविद्यापिठामध्ये जे शिक्षण दिले जाते ते शेतीसाठी निरूपयोगी ठरते. या शिक्षणाचा उपयोग फक्त नोकरी मिळविण्यासाठी होऊ शकतो. हे त्याला समजते, तेव्हा हा शिक्षित तरुण निराश होतो.

त्याचे हे शिक्षणातील ५ ते ७ वर्षे, शिक्षण आणि शेती याच्या उंबरठ्यावर उभा असणाऱ्या श्रीरामची मानसिक घालमेल हा या कादंबरीचा मुख्य धागा आहे. त्याचे शिक्षण संपत आले तरी मनातील गोंधळ मात्र संपलेला नसतो. हे महत्त्वपूर्ण आशयसूत्र शेषराव मोहीते यांच्या'धुळपेरणी' या कादंबरीत आढळते.

शिक्षणाची मुळातच आवड नसणारा श्रीराम सुरूवातीला शाळेत न जाता शेतातील कामातच गुंतून राहतो. या संदर्भात भास्कर भोळे लिहितात, ''लहानपणापासुन शेतीचा लळा लागलेल्या श्रीरामची 'धूळपेरणी' ही आत्मपर कहानी आहे. मळा, बैल, विहीर, गुरेढोरे यात मनापासून रमणारा श्रीराम शाळेच्या चार भिंतीत गुदमरतो.''[२९] यावरून शिक्षणात मन रमवू न शकणाऱ्या श्रीरामचे शेतीविषयीचे अपार प्रेम व्यक्त होते. त्याला ही शाळा म्हणजे बंदीस्त जीवन वाटते. चुलत्याच्या इच्छेखातर शिक्षण घेतो पण हे शिक्षण घेत असतानाही त्याच्या मनात गोंधळ चालूच असतो. हे सांगताना स्वत: श्रीराम कादंबरीच्या सुरूवातीला म्हणतो, 'एक पाय शाळेत. एक पाय मळ्यात करीत मी कसाबसा सातवी आठवी पर्यंत आलो.' अशा वातावरणामध्ये तो कसातरी मॅट्रीक पास झाला. परंतु आता तो

चुलत्याचे मत मोडून मेडीकलला न जाता ॲग्रीकल्चरला, परभणी कृषीविद्यापीठामध्ये प्रवेश घेतो. त्यामुळे चुलत्याबरोबरचे संबंध शेवटपर्यंत तणावाचे राहतात. याचा परिणामही त्याच्या मानसिकतेवर होत राहतो. श्रीरामच्या मनातील गोंधळ पुढीलप्रमाणे व्यक्त झाला आहे. "सगळी प्रश्नपत्रिका मोठ्या कष्टाने वाचून काढली. त्यातल्या त्यात सोपा वाटलेला एक प्रश्न सोडवायला सुरूवात केली. आणि डोक्यात नुसता लायनर, पिस्टन, गॅसकेट, बेअरिंग, नोझल, ऑईलसिल, डीझेलऑईल यांचाच कालवा उठला. त्यात पुन्हा सोन्या-मोत्याची याद येऊन रडावंच वाटायलं. आपण या कुठल्या आडरानात येऊन फसलो की न् काय नाही की."[३०] शेतीचा लळा लागलेला तरूण शिक्षण घेत असताना कोणत्या मानसिक अवस्थेतून प्रवास करतो हे यावरून समजते. अशा मानसिकतेतून शिक्षण घेणारा हा तरूण काही वेळा नापासही होतो. तेव्हा या शिक्षणातून एकदाचे सुटलो म्हणून आंनदी होतो. पण घरच्यांच्या दबावाखाली त्याला शिकावेच लागते. अशा गोंधळलेल्या मन:स्थितीमध्ये तो पदवी प्राप्त करतो. पण पुढे काय? असा त्याला प्रश्न पडतो. धड शेतीही करता येत नाही आणि नोकरी तर करायची नसते या मानसिकतेमध्येच तो जीवन जगतो.

कृषीविद्यापीठामध्ये शिक्षण घेत असताना श्रीरामला सिनेमा पाहण्याची सवय लागते. सिनेमा पाहत असतानाही त्याच्या मनातील गोंधळ संपलेला नसतो. आपण काहीतरी चूक करीत आहोत अशी भावनाही त्याच्या मनामध्ये निर्माण होते. तो म्हणतो, "भर उनाच्या कारात पट्टा पट्टा रान उकरून बाईनं जमवलेल्या कुडवाभर सरव्याच्या शेंगा. त्या विकून आलेले पैसे तिनं घरात कुणाला न कळू देता आपल्याला दिलेले. आणि त्या पैशाची अशी अधमपनानं उधळपट्टी करणारे आपण. तेव्हा सिनेमाच्या पडद्यावरली सारी सुंदर सजवलेली माणसं आणि दृश्य क्रुर होऊन जायची."[३१] आईने काबाडकष्ट करून दिलेला एक एक पैसा खर्च करायचा म्हटले की, या शिक्षित तरूणाला शेतातील वास्तव समोर दिसते तर दुसऱ्या

बाजूला मित्रांबरोबर सिनेमाची लागलेली ओढ, अशा पेचामध्ये हा तरूण सापडलेला असतो.

घरच्यांच्या विरोधात कृषीपदवीसाठी प्रवेश घेत असतानाची खंत त्याला सतत भेडसावत असते. गावाकडे जाऊन मेडीकलला प्रवेश घ्यावा की, परभणी कृषीविद्यापीठामध्ये प्रवेश घ्यावा, या विचाराने श्रीराम अस्वस्थ होतो त्याची ही अस्वस्थता सांगताना लेखक म्हणतात, ''एस. टी. पुढं चालल्याय का मागं! उभी राहील्याय का पळायल्याय काहीच कळंना, निव्वळ भ्रमल्यासारखं झालं, तसाच लातूरला पोहोचलो.''[३२]

शिक्षित तरूण श्रीराम हा शेतीविषयक शिक्षण घेऊन सुधारणेच्या मागे लागतो. त्याचे विचार आणि शेतीविषयक समस्या व नियोजन इतरांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असते. त्यामुळे त्याच्यामध्ये आणि तेथील शेतकऱ्यांमध्ये तफावत जाणवते. तो म्हणतो, ''माझ्या मनात बोचणारे प्रश्न वेगळेच. आणि आमचे आणि आई-बापाचे प्रश्न वेगळेच म्हणून आमच्या बोडक्यावर लादलेले प्रश्न वेगळेच. हे सगळं बघून पहिल्या दोन चार महिन्यातच पार हबकून गेलो. आपण शिकून ज्ञानी व्हायलो की अज्ञानी हे माझं मलाच समजेनासं झालं.''[३३] शिक्षण घेऊन आपण काय कमावले? असा प्रश्न श्रीरामला नेहमीच पडत असे. त्याने शेती सुधारणेसाठी कृषीपदवी घेतली खरी पण ती त्यासाठी कितपत फलदायी ठरली, असा विचार त्याच्या मनात येतो. आपण या शिक्षणामुळे पांगळे झालो असे त्याला वाटते. हे शिक्षण आता त्याला शेतीसाठी निरर्थक आहे असे वाटू लागते.

अशा प्रकारे श्रीराम आणि त्याच्यासारख्या अन्य शिक्षित तरुणांचे शिक्षण संपले तरी त्यांच्या मनातील घालमेल मात्र संपलेली नसते. ही घालमेल लेखकाने कादंबरीतील मुख्य आशयसूत्राच्या माध्यमातून येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### २. शिक्षित तरूणाचे गावापासून तुटलेपण

ग्रामीण भागातील शेतकऱ्याचा मुलगा शिक्षणासाठी नागरी संस्कृतीच्या सानिध्यात येतो. तेव्हा तो तेथील आचार-विचाराशी काही प्रमाणात का होईना

समरस होतो. त्यामुळे त्याच्यात हळुहळु बदल होऊन त्याला हे ग्रामीण जीवन नकोसे वाटू लागते. त्याच्या राहणीमाणामध्ये, अंतरंगामध्ये बराचसा बदल होतो. ज्या शेतीविषयी, काळ्या आईविषयी त्याच्या मनात आस्था असते ती जरी कायम असली तरी तो आता खेडूत संस्कृतीशी जुळवुन घेऊ शकत नाही. त्यामुळे तो गावापासून, घरापासून, शेतीपासून आणि एकूणच ग्रामीण जीवनापासून तुटत जातो. हे महत्त्वाचे आशयसूत्र 'धूळपेरणी' या कादंबरीमध्ये आढळते.

या कादंबरीचा नायक श्रीराम हा एका शेतकरी कुटुंबातील शिक्षित तरूण आहे. त्याने शेतीसुधारणेसाठी शेतीविषयक शिक्षण घेतले. त्याला जेव्हा या शिक्षणातील फोलपणा समजून येतो तेव्हा तो निराश होतो. सुरूवातीला शेतीवर जिवापाड प्रेम करणारा श्रीराम आता शेतीपासून तुटत जातो. त्याच्यात अंतरंगाप्रमाणेच बाह्यांगातही बदल होतो. त्याला मळकी, फाटकी कपडे घालू वाटत नाहीत. बुटावरती धूळही पडू देत नाही. गावाकडच्या आठवणीने गलबलून जाणारा श्रीराम गावातल्याच जगण्याचा वीट येऊन, असहाय्यतेला कंटाळून शहरी जीवनाकडे आकर्षिला जातो. त्याचे एवढे नागरीकरण होते की, तो शेतीपासून, ग्रामीण जीवनापासून तुटत जातो. एकीकडे तो म्हणतो, ''या जीवनातील अनेक अनुभव तर खूप कटू आहेत. पण तरीही हेच जीवन अधिक नैसर्गीक, निर्धास्त, निरागसतेचं, उदात्त! घामाच्या धारांनी भिजलेलं.''[३४] त्याची ही ओढ मात्र कायम राहत नाही. आपल्या शिक्षणाचा उपयोग शेतीसाठी केला आणि त्यातून नूकसानच झाले, तेव्हापासून त्याने ठरवले की,''गावाकडं कांही ढवळा ढवळ करायचीच नाही आसं ठरवून टाकलो. आणि गावाकडे जाऊन शेती करण्याची ईर्ष्या तेंव्हापासून हळू हळू कमी कमी होत चालली. एकीकडं जन्मापासून उरी बाळगलेल्या स्वप्नांचा इस्फोट! तर दुसरीकडं वाटेल ते झालं तरी ही परिस्थिती आपण बदलून टाकू; म्हणून मनात मस्ती. कांही झालं तरी त्या दारिद्र्याच्या दावणीला स्वत:चं नशीब स्वत:च्याच हातांनी नेऊन बांधण्याचं पातक आपल्याकडून घडू नये.''[३५] श्रीरामला

शेतामध्ये राहून शेती करण्याची, त्यामध्ये गुंतून राहण्याची थोडीही इच्छा राहत नाही. लहानपणापासूनच शेतीची आवड असणारा श्रीराम शेतीपेक्षा शिक्षणात रस घेताना दिसतो. त्याला भरपूर शिक्षण घ्यावे वाटते. आपल्याच घरातील पूर्वीच्या काही सवई त्याला आता नकोशा वाटतात. शहरी जीवनाची सवय झालेल्या श्रीरामला ग्रामीण जीवन असह्य वाटते. तसेच घरातील माणसांविषयीही तुटलेपणा निर्माण होतो तो म्हणतो, "आता मला मळ्यात जायचाही हुरूप येईना. आबा तर कुठंही समोर दिसला तर त्याचा रागराग यायला लागला. मला बाईशी कितीतरी बोलावं वाटायलं. पण त्या सतत गजबजलेल्या घरात बोलताही येईना. आजी, काकी, तिची पोरगी, सदा किरकिरणारी मिरी सदा आजूबाजूला."[३६] घरातील अशांत वातावरणही त्याला सहन होत नाही. गाव सोडून परभणीला शिक्षणासाठी जाणाऱ्या श्रीरामला आपण परत येऊ की नाही याचा विश्वास नसतो. म्हणून तो शेतात, माळावरती जाऊन पायतान काढून अनवाणी पायानेच फिरतो. आपण शेतीपासून, गावापासून तुटत चाललो आहोत याची जणू स्वत: श्रीराम कबूलीच देताना म्हणतो, "एकेकाळी शाळेविषयी किती अढी बाळगून होतो. पण असं शाळेशिवाय करमेनासं कसं झालं. एकही दिवस शाळा बुडवावीशी वाटेना. गणितात पैकीच्या पैकी मार्क नाही मिळाले की अपमान वाटायला लागला. राहणीमानही पार बदलून गेलं. उमरग्याच्या टेलरकडूनच कपडे शिवून आणायला लागलो. ते बिगर इस्त्रीचे घालावे वाटेनात."[३७] शहरी संस्कृतीत रमलेल्या श्रीरामला शहरातील रेकॉर्ड, संध्याकाळी बाहेर फिरण्याचा आनंद खेड्यात मिळत नाही, म्हणून त्याला गावातील एक-एक दिवस वर्षासारखा वाटतो.

अशा प्रकारे शिक्षित तरुणाच्या अंतरंगाप्रमाणेच बाह्यांगातही बदल होऊन तो गावापासून, कुटुंबापासून, शेतीपासून तुटत चाललेला दिसतो. शेषराव मोहिते यांच्या 'धुळपेरणी' या कादंबरीत 'शिक्षित तरुणाचे गावापासूनचे हे तुटलेपण' प्रकर्षाने चित्रित झालेले दिसते.

## ३. शिक्षणव्यवस्थेमधील निरर्थकता

'धुळपेरणी' या कादंबरीतून शेषराव मोहिते यांनी प्रचलित शिक्षणव्यवस्थेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाने शेतीसुधारणेसाठी मोठमोठी कृषीविद्यापीठे स्थापन केली आहेत. या विद्यापीठातून दिले जाणारे शिक्षण शेतीच्या विकासासाठी कितपत उपयुक्त ठरते याचा अभ्यास कोणीही केलेला नाही. आज या विद्यापीठातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा शेतकऱ्यांकडे त्याचे अधिक ज्ञान आहे. त्यामुळे अशा विद्यापीठातील परंपरेने चालत आलेला अभ्यासक्रम शेतीसुधारणेसाठी निरूपयोगी ठरताना दिसतो. ही कृषीविद्यापीठे म्हणजे फक्त नोकरीसाठी, परीक्षांसाठी शिक्षण देणारी विद्यापीठे आहेत असे लेखकास वाटते. या विद्यापीठातून पदवी घेऊन एकही विद्यार्थी आधुनिक पध्दतीने शेती करण्याचा प्रयत्न करीत नाही. तो या कृषीपदवीचा उपयोग नोकरी मिळवण्यासाठी करतो. या कृषीविद्यापीठाचा अभ्यासक्रम बदलला पाहिजे असे त्यांना वाटते. लेखक याचा सर्व दोष मंत्र्यांना आणि राजकारणी लोकांना देतात.

या कादंबरीचा नायक श्रीराम हाही कृषीपदवी घेऊन शेतीसुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. परंतु यामध्ये तो अपयशी ठरतो. शेतकरी हा अधिक कार्यक्षमतेने शेती करीत आहे त्यामुळे कृषीपदवी याठिकाणी निरर्थक ठरताना दिसते. ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षकही ज्ञानदानाच्या बाबतीत निष्क्रीय ठरतात. ते मुलांना शिकवण्याऐवजी पैशाच्या मागे लागलेले असतात. योग्यरीत्या ज्ञानार्जन न करता शासनाचा पगार असूनही विद्यार्थ्यांकडून वेगळी फी घेऊन शिकवणी चालवतात. यामुळेही शिक्षणचा दर्जा ढासळत चालला आहे हे सांगताना लेखक म्हणतात, "कुण्याही प्राध्यापकाचं बोलणं सहज नाही. आम्हाला समजतंय का नाही याची फिकीर नाही. आम्हालाही कळावं म्हणून कसले सायास नाहीत. ज्यांना जेवढं, जसं समजेल तेवढं पदरात पाडून घ्या. समजत नाही? ट्यूशन लावा."[३८] कोणताही शिक्षक वर्गामध्ये आत्मीयतेने शिकवत नाहीत. तो या संस्थेमध्ये डोनेशेन देऊन

आलेला असतो. त्यामुळे त्याच्याकडे तेवढ्या प्रतीचे ज्ञान असेलच असेही नाही. म्हणून तो विद्यार्थ्यांना शिकवणी लावण्यास सांगतो.

कृषीविद्यापीठामध्ये दिले जाणारे शिक्षण शेतीसाठी निरूपयोगी ठरत असतानाही शासनाचा शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण समाधानकारक नाही. हे सांगताना लेखक म्हणतात, ‘‘प्रत्येक गोष्टीकडे पाहताना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या प्रतिपादनात आणि ते जी पुस्तकं वाचून शिकवीत त्या पुस्तकातही शेतकरी समाजाविषयीचं प्रचंड अज्ञान, घोर गैरसमज दिसायला लागले. माझ्याच आईबापांची टिंगल टवाळी. त्यांना अज्ञानी, अडाणी, कामचुकार, आळशी संबोधून सुचवलेल्या उपाय योजना पाहून डोकं गरगरायला लागलं.’’[३९]

या कृषीविद्यापीठातील शिक्षणाचा उपयोग जेव्हा श्रीराम शेतीमध्ये आधूनिक पध्दतीने करू लागतो तेव्हा शेती सुधारणे ऐवजी नुकसानच सहन करावे लागते. यातूनही या शिक्षणातील निष्क्रीयता स्पष्ट होते. ज्या हेतूने श्रीराम शेतकी शिक्षण घेतो, तो हेतूच पुढे फसल्याचे त्याच्या लक्षात येते. त्याचे आधूनिक पद्धतीने शेती करण्याचे स्वप्नही भंग पावते. शेतकी कॉलेजमध्ये जे शेतीचे ज्ञान दिले जाते ते उत्तम शेती करण्यासाठी उपयोगी ठरत नाही. विद्यापीठात आणि शेतकी खात्यात नोकरी करण्यासाठी माणसे तयार करणारे शिक्षण मिळते असे त्याला वाटते. शेतकी विद्यापीठातील संशोधन, अभियांत्रिकी आणि शेतीशी निगडीत सर्वच शाखांमध्ये चाललेला भंपकपणा पाहून शेतकी शिक्षणातूनही त्याचे मन उटते.

अशा प्रकारे शिक्षण व्यवस्थेतेचे वास्तव लेखकाने येथे चित्रित केले आहे. शेतीविषयक दिलेले शिक्षण आणि प्रत्यक्ष केली जाणारी शेती यातील तफावत आणि याला कारणीभूत ठरणारा निष्क्रीय अभ्यासक्रम याचा आढावा लेखकाने येथे घेतला आहे.

**४. शेतीव्यवस्थेचे वास्तव**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून जरी शेतीकडे पाहिले जात असले तरी आज हा शेतीव्यवसाय अधोगतीला जाताना पहावयास मिळतो. याचे प्रमुख कारण

म्हणजे संकटात सापडलेला शेतीव्यवसाय. शेतकऱ्याला या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागत आहे. त्याच्या बदल्यात मिळणारे उत्पादन आणि बाजारभाव अतिशय नगण्य स्वरूपाचा आहे. त्यामुळे आज भारतीय शेतकरी हा कर्जबाजारी होऊ लागला. शेतकऱ्याच्या अनेक पिढ्या या शेतामध्ये राबण्यात गेल्या तरीही तो सुखी, समाधानी होऊ शकला नाही. याचाच परिणाम म्हणून शेतकऱ्याच्या मुलाने शिक्षण घेऊन नोकरीला लागणे महत्त्वाचे वाटू लागले आहे.

शेतकऱ्याच्या वेगवेगळ्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम शेषराव मोहिते यांनी येथे केलेले दिसते. त्या त्या काळात पडणारे ओले आणि कोरडे दुष्काळ येथे चित्रित केले आहेत. शेतकऱ्यांच्या पिढ्यान् पिढ्या शेती कसणाऱ्यांमध्ये व्यर्थ जातात आणि तरीही हाताला काहीच लागत नाही. म्हणून शेतकऱ्याच्या मुलाने शिकले पाहिजे आणि शिकून नोकरी केली पाहीजे असे लेखकाला वाटते. हे दु:ख मांडताना धुरपा म्हणते, ''आमच्या डोयान् डोया गारत झाल्या रे बाबा ह्या शेणामुतात तसले दिवस तुला येऊनी मनूनच बग ही सगळी वडवड!''[४०]

शेतकरी शेतामध्ये प्रत्यक्ष कष्ट करीत असतो परंतु राजकारणी लोक मोठमोठ्या आवाजात मंच्यावरून शेती सुधारणेच्या गप्पा मारत असतात. प्रत्यक्षात मात्र ते काहीही कार्यवाही करीत नाहीत. एकूनच या शासनाचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन दुय्यम दर्जाचा आहे. त्यातच भारतीय शेतकरी हा असंघटीत असल्यामुळे त्याचा वरिष्ठ स्तरावर विचार केला जात नाही.

शेतीमधून मिळणारे नगण्य उत्पन्न आणि दैनंदीन वाढलेला खर्च याचा ताळमेळ घालण्यातच या शेतकऱ्याचे पूर्ण आयुष्य खर्ची जाते. याचे वास्तव लेखकाने येथे मांडले आहे. ते म्हणतात, ''पुढच्या वर्षी सर्व गोष्टी वेळच्या वेळी करू म्हणजे मनाजोगतं पीक येईल म्हणणारा, एखादवेळी चांगलं पीक हाती लागलं तरीही बाजारपेठेत जाऊन मार खाणारा. कोरडवाहू शेती बिनभरोशाची म्हणून नखा बोटांनी टोकरून विहीरी पाडणारा. त्यात आपल्या बायका लेकरांसह वर्षानुवर्षे

गाडून घेणारा, हरेक हंगामात या बांधा पासून त्या बांधापर्यंत तिफणीवर मूठ ठेवून बियाणाची पेरणी करताना डोळ्यापुढं नवनवीन स्वप्नं बघणारा. बुडालेल्या पिकांसोबत उन्मळून पडणारा. पुन्हा नव्या जोमानं उठून उभा राहणारा... त्याच्यावर मात्र टाचा घासून मरायची पाळी आली.''[४१] एकावर्षी उत्पन्न कमी मिळाले म्हणून हा शेतकरी मूग गिळून गप्प न राहता तो नवीन पिकाच्या तयारीला लागतो. नव्या उमेदीने कष्ट करतो. पण अनियमीत निसर्ग आणि शेती अशा अनेक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याची शेवटी परिस्थिती हलाखीची होते. याचे वास्तव चित्रण लेखकाने येथे केले आहे.

आप्पा मास्तर पैसे खर्च करून शेतामध्ये ऊस लावतात. ऊसाचे उत्पादनही चांगले येते. परंतु त्याला योग्य बाजारभाव येत नाही म्हणून उभा ऊस जाळून टाकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते. हे सांगताना आप्पा मास्तर म्हणतात, ''गुऱ्हाळाचा खर्च निघेल इतकाही भाव गुळाला नाही. आणि कारखाना तर ऊस न्यायला तयार नाही. आजूबाजूचे शेतकरी ऊस जाळून टाकताहेत. आम्ही तोडून बैलांना म्हशींना खाऊ घालीत आहोत. रान तर मोकळं व्हायला पाहीजे. म्हणून बहुतेक आपलाही राहिलेला ऊस उभा जाळावा लागणार.''[४२] यामुळेच हा शेतकरी आणि शेतीव्यवसाय सुधारू शकलेला नाही.

अशाप्रकारे शेषराव मोहिते यांनी शेतीव्यवसायांवरील काही समस्या, शेतकरी, शेतीमालाला दिला जाणारा अत्यल्प बाजारभाव आणि त्याचे होणारे परिणाम या सर्वांचा उहापोह या कादंबरीत केलेला दिसतो.

**५. शिक्षित तरुणाचा संघर्ष**

हा संघर्ष मुख्यत: दोन पिढीतील संघर्ष आहे. हा संघर्ष प्रचलीत समाजव्यवस्थे विरुद्ध व अन्यायाविरुद्ध आहे असे चित्रण शेषराव मोहिते यांच्या कांदबरीत येते.

या कांदबरीतील गोपाळ गुरुजी आणि त्यांच्याच भावाचा मुलगा श्रीराम हे दोघेही शिक्षित आहेत. या दोन्ही शिक्षितांमध्ये सुरुवातीपासूनच शिक्षणाच्या कारणावरुन तणाव निर्माण होतो. आप्पा मास्तर शिकून नोकरीला लागतात. पण तो शेतीला अद्यापर्यंत विसरलेला नाही. त्याला जशी शेतीची आवड असते तशीच आवड श्रीरामलाही असते. परंतु श्रीरामने शेती न करता शिक्षण घेऊन डॉक्टर व्हावे अशी महत्त्वाकांक्षा आप्पा मास्तरची असते. त्यामुळे दोघात काही काळ वैचारिक संघर्ष चालू राहतो. श्रीरामला शिक्षण घेतलेच तर कृषी क्षेत्रातील कृषी पदवी घेण्याची त्याची इच्छा असते ही पदवी घेऊन शेती सुधारणा करण्याची त्याची धारणा असते. तर आप्पा मास्तरला आपल्या पुतण्याला डॉक्टर बनवायचे असते.

या दोघांमधील हा संघर्ष मात्र कधीही विकोपाला जात नाही. शेवटी आप्पा मास्तरच श्रीरामच्या शिक्षणाचा खर्च करत असतात. त्यातील राग सोडला तर आप्पाच्या मनात श्रीरामविषयी प्रेमभावनाच असते. पण बऱ्याच वेळा श्रीरामच्या मनात आप्पाविषयी राग असतो.

आप्पा मास्तर घरचा कारभारी असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कोणीही एक शब्द बोलत नाही. पण श्रीराम हा शिक्षित तरुण त्याला न जुमानता त्यांच्याविरूद्ध समोर उभारुन बोलतो. स्वत:वर होणारा अन्याय तो सहन करीत नाही. आप्पाचा विरोध असतानाही तो घरातून पळून जाऊन परभणीला कृषीविद्यापीठामध्ये प्रवेश घेतो. तेव्हा तो म्हणतो, '' जरा सुद्धा त्याच्या मनाविरुद्ध कुणी काय वागायला बोलायला भाग नाही. हया घरात ऊठसूठ ज्याच्या त्याच्यावर संताप आणि आदळाआपट. येवढ्या तेवढयाला केसं तोडून घ्यायचं आणि समोरच्याला जेरील आणायला बघायचं. तुमी करता त्याचं सहन सगळं. पण मला काही जमायचं नाही तसं.''[४३] आप्पा कारभारी असल्यामुळे सर्वांना तो कामासाठी बोलतो. त्यांच्याविरुद्ध कोणीही काहीही बोलत नाही. त्याने सांगितलेली प्रत्येक गोष्ट खाली मान घालून ऐकूण घेतात. ही लाचार वृत्ती श्रीरामची नसल्याने तो स्वाभिमानाने सांगतो की, ''आप्पा

असेल कारभारी घराचा. पण म्हणून का सगळ्या जगाचा जाणता झाला का? वादावादी करायचं टाळू त्याच्याशी. पण आपल्या मनाला जे पटतंय तेच करू. तो काय वाघबीघ आहे का काय? फाडून खाणाराय थोडाच आपल्याला?''[४३] आप्पा जरी घरचा कारभारी असला तरी आपणही याच घरातील एक प्रतिनिधी आहोत. त्यामुळे आपल्याच मनाने राहू अशी अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती असणारा श्रीराम दिसतो.

आप्पा मास्तर घरातील कारभारी असूनही श्रीराम आप्पाचा मान ठेवत नाही. तो स्वत:च स्वत:चा निर्णय घेऊ लागतो. आप्पाच्या दडपणाखाली राहणे त्याला पसंत नसते. म्हणून श्रीरामवर रागावलेला आप्पा मास्तर म्हणतो, ''ह्या घरात आजकाल प्रत्येक जण आपआपल्या मनाचा मालक झालाय. गेलसाली दुधाचा पैसा जास्त झाला म्हणून बसवकल्याण पातोर सिनेमा बघायला गेले. आतातर काय परभणी धरून उधळत निघालेत महाराज! कड लावलीत घराची.''[४५] एक-एक पैसा कमवणाऱ्यालाच पैसे कसे खर्च करावेत याची जाण असते. म्हणूनच आप्पा श्रीरामला याची जणू जाणीव करुन देतात. वास्तविक पाहता श्रीराम आप्पाच्या मनाविरुद्ध शिक्षण घेण्यासाठी परभणीला निघाला होता, याचा रोषही याठिकाणी व्यक्त होतो. घरातील कारभारी व्यक्तीच्या विरुद्ध निर्णय घेतल्यानंतर त्या व्यक्तिला कारभाऱ्याकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही. त्याचप्रमाणे श्रीरामला पैशाची आवश्यकता असते तेव्हा आप्पा मास्तर मात्र एक रूपयाचीही मदत करण्याच्या मन:स्थितीत नसतात. ते म्हणतात,''तू मला काही एक सांगायची जरुरी नाही. माझ्यावर विश्वास नाही तुझा. मी वाटोळं करायला निघालो होतो तुझं. बस्स! याच्या पुढं तू मला काही सांगायचं नाही. माझं काही ऐकायचं नाही.''[४६] श्रीरामचा आप्पावर विश्वास नसतो. आप्पांना माहिती झाले तर ते परभणीला जाऊ द्यायचे नाहीत, अशी त्याची धारणा असते. आपल्याला विचारले नाही याचा राग आप्पांच्या मनामध्ये असतो. हाच राग येथे व्यक्त होताना दिसतो.

असा हा दोन पिढीतील संघर्ष आहे. एका पिढीचे प्रतिनिधीत्व आप्पा मास्तर तर दुसऱ्या पिढीचे प्रतिनिधीत्व श्रीराम करतो. या दोन्ही पिढीतील कालखंडाच्या तफावतीबराबेरच वैचारिक मतभेदही आहेत. नोकरी करीत असूनही शेतीची ओढ असणारा आप्पामास्तर मात्र आपल्या पुतन्याला शेती करण्यासाठी विरोध करतो. पण शेतीची मनापासून आवड असणारा श्रीराम शेतीच करायची असे ठामपणे ठरवून टाकतो. त्यामुळेच या दोघातील संघर्ष हा शेतीसंस्कृती आणि शिक्षण यांच्याशी निगडीत असलेला दिसतो.

यावरून असे दिसते की, दोन पिढीतील संघर्षाबरोबरच शिक्षित तरुणाचा हा संघर्ष कधी प्राध्यापकांविरुद्ध आहे तर कधी दोन गटातील विद्यार्थ्यांमध्ये आहे. अशा स्वरुपाच्या संघर्षामुळे विद्यापीटाची एकात्मता धोक्यात आलेली दिसते. यामध्ये प्राध्यापकही काही प्रमाणात खतपाणी घालताना दिसतात. अशा स्वरुपाचे 'शिक्षित तरुणाचा संघर्ष' हे आशयसूत्र शेषराव मोहिते यांच्या कादंबरीत आढळते.

### ६. शिक्षित तरुणाचे शेतीविषयी प्रेम

शेतकरी कुटुंबातील तरुण हलाखीचे जीवन जगत विद्याविभूषीत होतो आणि नोकरीलाही लागतो. पण हे करीत असताना तो आपल्या ग्रामीण, खेडूत संस्कृतीला, गावाला विसरला नाही. त्याचे आताही पूर्वीएवढेच शेतावर आणि गावावर प्रेम असते. याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे शेषराव मोहिते यांची ही कादंबरी. त्यांच्या कादंबरीमध्ये हे आशयसूत्र आढळते.

गोपाळ गुरुजी हा शिक्षण घेऊन नोकरीला लागतो. पण तो तेवढाच घट्ट शेतीशी बांधला गेलेला एक तरुण आहे. तो नोकरी करीत असला तरी त्याची सर्व ओढ ही शेतीकडे असते. शेतीमध्ये नवनवीन सुधारणा करण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. त्यामुळे तो शेतीशी आणि घराशी एकनिष्ठपणे बांधला गेलेला तरुण दिसतो.

गोपाळगुरुजी प्रमाणेच त्याचा पुतन्या श्रीराम हाही शेतीमध्ये अगदी मन लावून काम करतो. त्याला शिक्षणात अजिबात रस नसतो. शाळेत जाण्यापेक्षा शेतीच करणे त्याला आवडत असते. शेतीवर, जनावरांवर प्रेम करणारा श्रीराम शाळेत मन रमवू शकत नाही. म्हणून तो म्हणतो, ''मुकाट्यानं त्या शाळेत जातो. हीच केवढी अघोरी शिक्षा भोगत आहोत आपण! आपलं कांही नाहीच त्या अभ्यासाच्या पुस्तकात. तर ती पुस्तकं आपण वाचावीतच कशाला! आपली ही विहीर, तिच्यावरलं इंजन. हा मळा. हिरवागार लवलवणारा ऊस. कोट्यात न मावण्याइतके धिप्पाडच्या धिप्पाड धाऱ्या हाणम्या. शेख फरदाचा माळ. या सगळ्या पुढं किती निर्जीव आणि भकास आहे तो अभ्यास?''[४७] शेतातील या निसर्गापेक्षा, जनावरांपेक्षा आणि त्याठिकाणी मनमोकळेपणाने वावरण्यासाठी असणाऱ्या माळापेक्षा ही शाळा, पुस्तके त्याला निर्जीव वाटू लागतात. म्हणून त्याचे मन शाळेत रमू शकत नाही.

मास्तर शिकवीत असताना श्रीरामचे शाळेत मन लागत नाही. तो जरी शरीराने शाळेत बसत असला तरी मनाने मात्र शेतात भटकत असतो. त्यामुळे त्याचे मन कधीही शिक्षणासाठी ओढ घेऊ शकत नाही. तो शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांच्या प्रत्येक उदाहरणाला शेतातील संदर्भ जोडताना दिसतो.

उच्च शिक्षणासाठी गाव, घर आणि शेती सोडून गेलेला श्रीराम पुन्हा शेतीमध्ये येतो आणि मनमुरादपणे त्यात रमतो. पण पुन्हा ही भूमी सोडून जाताना एखाद्या सासूरवासीनीसारखी त्याची अवस्था होते. हे सांगताना लेखक म्हणतात, ''परभणीला एकदा निघून गेल्यावर पुन्हा इथं यायला मिळणार नाही म्हणून काल अनवाणी पायांनीच माळ सारा पालथा घातला. पायांना अजून ताजं गवत कुरवाळतंय असं वाटलालं.''[४८]

श्रीरामला एक तर शिक्षण नको आहे आणि जर घेतलेच तर शेतीविषयक शिक्षण घ्यायचे असते. शेतीविषयक शिक्षण घेऊन शेतीसुधारणा करण्यासाठी त्याने एक प्रकारचा ध्यासच घेतला होता. त्यामुळेच तो चुलत्याच्या मताला विरोध करून परभणीला कृषीविद्यापीठात प्रवेश घेतो. या विद्यापीठातील आधूनिक तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग शेती सुधारणेसाठी करण्याची त्याची इच्छा असते. म्हणून तो म्हणतो, "आपला खरचं इथं नंबर लागला, तर खूप अभ्यास करू. आधुनिक शेतीचं सगळं तंत्र आत्मसात करू. आबा बाईचा उभा जन्म शेतात खपण्यात गेला. तरीही अपेशा शिवाय त्यांच्या पदरात काही पडलं नाही. आणि हे अपेशीपण कशानं येतं तेही ह्यातभर कळलं नाही. हे असं का घडलं त्याचाही शोध घेऊ. अणि पिढ्यान-पिढ्या पासून चालत आलेला हा अपेशाचा टिळा पुसून काढू!"[४९] यावरून श्रीराम शिक्षण घेऊन शेतकऱ्यांच्या समस्यांचे निवारण आणि आधुनिक पद्धतीने शेती सुधारणेची जणू शपथच घेताना दिसतो.

अशाप्रकारे शेतकरी कुटुंबातील तरुण हा कितीही शिकला तरी तो आपला मूळ पिंड विसरत नाही, हेही याठिकाणी लेखकाला सांगायचे आहे. तो आपल्या शेती, संस्कृतीला पोरका होऊ शकत नाही. याचे प्रत्यंतर शेषराव मोहिते यांच्या कादंबरीतील आशयसूत्रात पहावयास मिळते.

### ७. शिक्षणामुळे झालेला बदल

शेतकरी कुटुंबातील तरुण शिक्षणासाठी काही दिवस शहरामध्ये राहून आल्यानंतर त्याला तेथील सवयी आपल्या गावात पूर्ण करता येत नाहीत. यामुळे तो पूर्वीच्या ग्रामीण जीवनाशी समरस होऊ शकत नाही. त्याच्यात झालेला बदल हा शिक्षणामुळे झालेला असतो. शिक्षित तरुणाचा हा बदल लेखकाने येथे मांडला आहे.

शेतकरी कुटुंबातील आप्पा शिक्षण घेऊन मास्तर होतो. तेव्हापासून त्याच्यातही काही प्रमाणात बदल झालेला जाणवतो. त्याच्यात झालेला बदल हा शेतीविषयक बदल आहे. नोकरीला लागल्यानंतर त्याने शेतीसुधारणेवर भर देऊन शेती आणि घर सुधारणेचा पहिला प्रयत्न केला. त्याने नोकरीच्या पैशांमधून विहीर पाडली, त्या विहीरीवर इंजिन बसवले. त्यामुळे पूर्वापार चालत आलेली मोट बंद होते. रॉकेलच्या इंजिनद्वारे विहीरीतून पाणी बाहेर काढले जाते. त्यामुळे बैलांनाही विश्रांती मिळते.

त्याचबरोबर शेतीमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी हा तरुण मार्गदर्शन करतो. शेतकऱ्याची सुधारणा ही केवळ शेती करून केव्हाही होऊ शकत नाही हे या सुशिक्षित तरुणाने जाणले होते. म्हणून प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबातील एक तरी व्यक्ती नोकरीला असली पाहिजे असे त्याचे मत होते. त्यासाठीच तो आपला पुतन्या श्रीरामला शिकवून मोठा डॉक्टर करण्याचे ठरवतो.

शिक्षित तरुण श्रीरामच्या व्यक्तिमत्त्वातही शिक्षणामुळे काही प्रमाणात बदल होतो. त्यामुळेच तो कारभारी असणाऱ्या चुलत्याला त्याच्यावर लादल्या गेलेल्या विचाराच्या विरोधात सडेतोड उत्तरे देतो. या शिक्षणामुळे तो स्वावलंबी होतो. शिक्षणाने त्याच्यात शहाणपण येते. पण काही प्रमाणात दुरावाही निर्माण होतो. यामुळेच तो घरातील विचाराला विरोध करु लागलेला दिसतो.

कृषीविद्यापीठाची पदवी घेऊन आलेला श्रीराम आपल्या या ज्ञानाचा उपयोग करून शेतीमध्ये डाळींबाची लागवड करतो आणि शेती सुधारणेच्या मागे लागतो. तो यामध्ये अपयशी होतो, पण हा घेतलेला ध्यास त्याच्यामध्ये या शिक्षणामुळेच जागृत झालेला असतो. एकेकाळी शाळेविषयी तिरस्कार असणारा श्रीराम शाळेमध्ये मन लावून अभ्यास करतो. त्याच्या मानसिकतेप्रमाणेच बाह्यांगातही बदल होतो.

तो चांगले शिवलेले, इस्त्री केलेले कपडे, बुट वापरतो. त्यामुळेच तो घरापासून, गावापासूनही तुटत जातो.

असा हा श्रीराम एन. एस. एस्. च्या कॅम्पला जातो. त्याठिकाणी भाषण करतो, ''आम्ही कृषविद्यापीठातली मुलं म्हणजे सर्वत्र बदनाम. सतत आमचे हात मारामाऱ्या करण्यात, एकमेकांची डोकी फोडण्यात गुंतलेले. पण यापूढे आमचा प्रत्येक हात उचलला जाईल तो काही तरी जोडण्यासाठी.''[५०] समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची महत्त्वाकांक्षा आणि जिद्द तो व्यक्त करतो. त्याचे हे छोटेशे भाषण सर्वांना प्रभावित करून टाकते.

एकंदरीत, शेषराव मोहिते यांनी 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' या कांदबऱ्यातून शेतकरी कुटुंब, त्याचे जीवन आणि समस्या तसेच शेतकरी कुटुंबातील शिक्षित तरुण आणि त्याची मानसिकता यांचे दर्शन घडिवले आहे. शेषराव मोहिते यांनी प्रचलित शेतीविषयक, शिक्षण व्यवस्थेवरही या माध्यमातून प्रकाश टाकला आहे.

**आशयसूत्रांचे वेगळेपण**

इतर मराठी कादंबऱ्यांपेक्षा शेषराव मोहिते यांच्या दोन्ही कादंबऱ्यांतून काही नवीन प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केलेले दिसते. आशयाच्या दृष्टिने काही प्रमाणात साम्य दिसून येत असले तरी बऱ्याच प्रमाणात भिन्नताही जाणवते. 'असं जगणं तोलाचं' व 'धूळपेरणी' या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहात गणल्या जात असल्या तरी 'धूळपेरणी'ची भाषा, संवाद पाहता तिला ग्रामीण कादंबरी म्हणावे की नागरी हा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळेच या दोन्ही कादंबऱ्यांतही काही प्रमाणात भिन्नता जाणवते.

'असं जगणं तोलाचं' या कादंबरीमध्ये 'सावकारी ओझ्याखाली आलेले शेतकऱ्याचे जीवन' हे महत्त्वपूर्ण असे आशयसूत्र आढळते. अशा स्वरूपाच्या

आशयसूत्र अन्य कादंबऱ्यामध्ये आले असले तरी यामध्ये वेगळेपण जाणवते. हे वेगळेपण म्हणजे शेतकऱ्याच्या मुलाला कर्जाला कंटाळून करावी लागणारी आत्महत्या. शेषराव मोहिते यांनी शेतकऱ्याच्या आत्महत्येचे भांडवल न करता जे आहे ते सत्य वाचकासमोर मांडण्याचा  प्रयत्न केला आहे. या कादंबरीतील सर्व घटना, प्रसंग या वास्तवाभिमूख आहेत. कोठेही अतिशयोक्ती आलेली नाही किंवा कल्पनाशक्तीचा अतिरेक होऊ दिलेला नाही.

'धूळपेरणी' ही ग्रामीण जीवनापासून नागरी जीवनाकडे आकर्षिल्या गेलेल्या तरुणाची कहाणी आहे. या नायकाचे पूर्णत: शहरीकरणही होऊ शकले नाही आणि ग्रामीणतेशीही एकरुप झालेला दिसत नाही. असा आगळा-वेगळा आशय मांडणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीवरती जरी 'कोसला'चा प्रभाव जाणवत असला तरी त्यातील पांडुरंग आणि हा श्रीराम यांच्यात बऱ्याच पातळीवर भिन्नता दिसून येते.

या दोन्ही कादंबऱ्यातून शेषराव मोहिते यांनी शेतकऱ्याचे जीवन, समस्या, सावकारी, शिक्षित तरुणाची मानसिक घालमेल, तुटलेपण इ. वेगवेगळया आशयसूत्राच्या माध्यमातून एक वेगळे जीवनचित्रण केलेले दिसून येते. अशा विविध बाबतीत मोहिते यांच्या कादंबऱ्यांतील आशयसूत्राचे वेगळेपण सांगता येईल.

## आशयसूत्रांची वैशिष्ट्ये

शेषराव मोहिते यांनी आपल्या कादंबऱ्यातून व्यक्त केलेला आशय हा कधी सुक्ष्म, कधी व्यमिश्र तर कधी गुंतागुंतीचा होताना दिसतो. मानव, निसर्ग, ग्रामीण जीवन आणि मानवीमन यांच्याशी जोडले जाणे आणि तुटणे यांची सांगड घालून कथानकातील आशय समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण जीवन, शेतकरी कुटुंब, कृषीजीवन अशा अनेक विषयांचा समावेश शेषराव मोहिते यांच्या आशयसूत्रात आढळतो. त्यांनी ग्रामीण जीवन आणि

संस्कृतीच्या वातावरणातील मानवी संवेदनांचा अचूक वेध घेतला आहे. ग्रामीण खेडयातील जीवनशैलीचे अचून निरीक्षण करुन आपल्याला भावलेल्या आशयाला त्यांनी शब्दबद्ध केले आहे. त्यांनी मानवी मनाबरोबरच, प्राणीमन आणि शेतकऱ्याशी अधिक जवळीकता असणाऱ्या निसर्गाला महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळेच मानवी मनातील कोंडमारा, राग, लोभ, तिरस्कार, ताण-तणाव, आपलेपण, त्याग, प्राण्याच्या मनातील प्रेमभाव आणि निसर्ग जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कृषीजीवन आणि समस्या, शिक्षित तरूण आणि त्याची मानसिकताही जाणून घेणाचा प्रयत्न केलेला दिसतो. हे शेषराव मोहिते यांच्या कादंबरीतील आशयसूत्रामधून विशेषत्त्वाने जाणवते.

ग्रामीण जीवणातील विविध समस्या हा या कादंबऱ्यांचा महत्त्वाचा गाभा आहे. आशय, पात्र, प्रसंग, स्थळ, काळ इ. घटकांनी मिळून हा साहित्यकृतीचा आकृतीबंध तयार होत असतो. हा आकृतीबंध साहित्यकृतीवर आधारलेला असतो. साहित्यकृतीच्या या घटकांच्या संघटित तत्त्वांनी शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यातील आशय एकरुप झालेला दिसतो. हेच त्यांच्या कादंबऱ्यांतील महत्त्वाचे विशेष मानावे लागेल.

## समारोप

शेषराव मोहिते यांनी या दोन्ही कादंबऱ्यांतून एकाच कुटुंबातील तीन पिढयांचाँ इतिहास मांडलेला असल्यामुळे आशयाची काही ठिकाणी पुनरावृत्ती होताना दिसते. त्यांनी ग्रामीण जीवनातील वास्तव मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'सावकारी ओझ्याखाली आलेल्या शेतकऱ्याचे जीवन' या आशयसूत्रातून शेषराव मोहिते यांनी सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्याचे जीवन चित्रित केले आहे. शेती करीत असताना, कुटुंब चालवत असताना सावकाराच्या तगादयाने शेतकऱ्याचे होणारे हाल येथे व्यक्त झाले आहे. हरिबासारखा शेतकरी सावकारी कर्जाचा शिकार कसा होतो याचे वास्तव या कादंबरीतून मांडले आहे.

'शेतकऱ्याचे स्वाभिमानी जगणे' या आशयसूत्रातून शेतकऱ्याचा स्वाभिमान दिसून येतो. शेतकऱ्यावर कितीही समस्या, संकटे आली तरी त्यावर मात करून स्वाभिमानाने जीवन जगताना दिसतो. तो कधीही कोणाची लाचारी पत्करत नाही.

'शेतकऱ्याचे कष्ट' यामध्ये शेतकऱ्याला आहोरात्र करावे लागणारे कष्ट येते. आपल्या कुटुंबासाठी शेतामध्ये राबराब राबणारा शेतकरी आणि पोटासाठी मजुरी करून भूक भागवणाऱ्या मजुराचेही कष्ट येथे आले आहे. शेतकरी शेतीमध्ये रात्रंदिवस कष्ट करीत असतो. शेतीवर येणाऱ्या अनेक संकटांना त्याला तोंड द्यावे लागते. शेतीवरील या वेगवेगळ्या संकटांमुळे शेतकऱ्याला शेती करणे असह्य होते. याचे वास्तव 'शेतीवरील अस्मानी व सुलतानी संकटांमधून' चित्रित झाले आहे.

ग्रामीण तरुण शिक्षण घेवून नोकरीला लागतो, कृषी पदवी घेतो. परंतु हा शिक्षित, नोकरदार तरुण आपली कृषीसंस्कृतीशी जुळलेली नाळ कधीही तोडू शकत नाही. याचे प्रत्यंतर 'शिक्षित तरुणाचे शेतीवरील प्रेम' या आशयसूत्रातून येते.

भ्रष्ट शासन, प्रशासन, व्यक्ती आणि समाज यांचा त्रास शेतकऱ्याला कसा सहन करावा लागतो हे 'धूर्त आणि भ्रष्टाचारी प्रशासन' मधून दिसते. तर शेतकऱ्याची अनेक स्थरावर कशा पद्धतीने फसवणूक केली जाते याचे वास्तव 'शेतकऱ्याची फसवणूनक' मधून व्यक्त झाले आहे. शेतकरी कुटुंबातील कष्टकरी स्त्री, पुरूषाच्या मागे धैर्याने उभाराहणारी स्त्री, तसेच संकटाच्यावेळी पुरूषाला धीर देणारी, मार्गदर्शन करणारी आणि शेतीसुधारणेसाठी धडपडणारी ग्रामीण स्त्री शेषराव मोहिते यांच्या कादंबरीत आलेली दिसते. शिक्षण की शेती या मानसिक घालमेलीत अडकलेल्या तरूणाच्या मनाचा गोंधळ 'शिक्षित तरूणाची मानसिक घालमेल' या आशयसूत्रातून व्यक्त झाली आहे. उदा. श्रीराम. शेती सुधारणेसाठी घेतलेले शिक्षण निरर्थक ठरते तेव्हा हा शिक्षित तरुण शेतीपासून, घरापासून कसा तुटत जातो हे 'शिक्षित तरुणाचे गावापासून तुटलेपण' मधनू दिसते.

शिक्षणातील निष्क्रीयता, बेजबाबदार शिक्षक आणि प्राध्यापक हे 'शिक्षणव्यवस्थेमधील निरर्थकता' मधून व्यक्त होते. शेतीची सद्यस्थिती, शेतीतील

उत्पादन आणि बाजारभाव यातील तफावत व ढासळत जाणारे कृषीजीवन हे ‘शेतीव्यवस्थेचे वास्तव’ मध्ये मांडले आहे. दोन पिढीतील वैचारिक संघर्ष येतो. हा संघर्ष शिक्षण आणि शेती यासंबंधातील आहे. यासंघर्षाचे चित्रण ‘शिक्षित तरुणाचा संघर्ष’ मध्ये केलेले दिसते. शिक्षण घेतल्यानंतर ग्रामीण तरुणामध्ये चांगले आणि वाईट, दोन्ही बदल कशा पद्धतीने होतात याचे वास्तव ‘शिक्षणामुळे झालेला बदल’ या आशयसूत्रातून व्यक्त होते. अशा विविध आशयसूत्रांच्या सहाय्याने शेषराव मोहिते यांनी कथानक समृद्ध केले आहे.

शेषराव मोहिते यांच्या कादंबऱ्यांतील आशय हा कृषीसंस्कृती, ग्रामीण जीवनाशी संलग्नित आहे. त्याचे खोलात जाऊन निरीक्षण केल्यानंतर त्यासंबंधी चित्रण केल्यामुळे आशयाला व्यापकता प्राप्त झाली आहे. ग्रामीण जीवनातील सूक्ष्म निरीक्षणामुळे त्यांचे लेखन वास्तवाभिमूख झाले आहे. मानवी जीवनातील समस्या, कारुण्य, शेतकऱ्याच्या असहय जीवनाचा पट उलगडून दाखवताना वाचकांना अंतर्मूख करण्याचे सामर्थ त्यांच्या कादंबरीमध्ये जाणवते.

पारंपरिक एकत्र कुटुंबपद्धती, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचे जीवन, शेतकरी कुटुंबातील शिक्षित तरुण आणि शेती यांचा एक पटच लेखकाने चित्रित केला आहे. आधुनिक युगात जीवन जगत असताना शेतकरी कुटुंबातील विविध समस्यांचा वेधही घेण्याचा प्रयत्न शेषराव मोहिते यांनी केला आहे. या काळातील शिक्षित तरुण, शेतीसंस्कृती आणि गावापासून तूटत जाणे याचाही वेध येथे घेतला आहे.

शेषराव मोहिते यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाबरोबरच समाजकारण, राजकारण, प्रचलित शासनव्यवस्था, अनियमित निसर्ग, शिक्षण व्यवस्था यावरही प्रकाश टाकला आहे. तसेच शेतकरी कुटुंबातील पुरुष संकटापासून जेव्हा पळ काढतो तेव्हा घरातील स्त्री कशी खंबीरपणे उभी राहते याचे वास्तव या कादंबरीतून मांडून पुरुषप्रधान संस्कृतीवरही प्रकाश टाकला आहे.

## संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | गणोकर, प्रभा व इतर | : | (संपा.) 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोष', जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मुबंई, प्रथमावृत्ती– २००१ पृ. ११७. |
| २. | मोहिते, शेषराव | : | 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ८. |
| ३. | तत्रैव | : | पृ. ७. |
| ४. | तत्रैव | : | पृ. १८. |
| ५. | तत्रैव | : | पृ. ५४. |
| ६. | तत्रैव | : | पृ. २. |
| ७. | तत्रैव | : | पृ. ८. |
| ८. | तत्रैव | : | पृ. ६८. |
| ९. | तत्रैव | : | पृ. १८२ |
| १०. | तत्रैव | : | पृ. १९६. |
| ११. | तत्रैव | : | पृ. २२३. |
| १२. | तत्रैव | : | पृ. २३८. |
| १३. | तत्रैव | : | पृ. २४३ |
| १४. | तत्रैव | : | पृ. ०३. |
| १५. | तत्रैव | : | पृ. ५४,५५. |
| १६. | तत्रैव | : | पृ. ९०. |
| १७. | तत्रैव | : | पृ. १५४. |
| १८. | तत्रैव | : | पृ. १८६. |
| १९. | तत्रैव | : | पृ. २७५. |

२०. मोहिते, शेषराव : 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ५२.

२१. तत्रैव : पृ. २१०.

२२. तत्रैव : पृ. २२९.

२३. तत्रैव : पृ. २५७.

२४. तत्रैव : पृ. २६७.

२५. चंदनशिव, भास्कर : 'प्रतिष्ठान', मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, मार्च एप्रिल १९९७, पृ. ६१.

२६. मोहिते, शेषराव : 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ७३.

२७. मुलाटे, वासुदेव : 'नवे साहित्य नवे आकलन', मराठवाडा पाब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद,१९९६, प्रथमावृत्ती, पृ.१४७.

२८. मोहिते, शेषराव : 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४, पृ. २४३.

२९. भोळे, भास्कर लक्ष्मण : 'प्रतिष्ठान', मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, नोव्हें-डिसें, २००१, पृ. ३७.

३०. मोहिते, शेषराव : 'धूळपेरणी', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, २००१, पृ. ४८.

३१. तत्रैव : पृ. ७७.

३२. तत्रैव : पृ. ११५.

३३. तत्रैव : पृ. २६८.

३४. तत्रैव : पृ. २४०.

३५. तत्रैव : पृ. २५६.

| | | | |
|---|---|---|---|
| ३६. | मोहिते, शेषराव | : | 'धूळपेरणी', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, २००१, पृ. ७२. |
| ३७. | तत्रैव | : | पृ. ८१. |
| ३८. | तत्रैव | : | पृ. ८७. |
| ३९. | तत्रैव | : | पृ. २६७. |
| ४०. | तत्रैव | : | पृ. ५६. |
| ४१. | तत्रैव | : | पृ. १३७. |
| ४२. | तत्रैव | : | पृ. २१७. |
| ४३. | तत्रैव | : | पृ. १११. |
| ४४. | तत्रैव | : | पृ. १११-११२. |
| ४५. | तत्रैव | : | पृ. ११२. |
| ४६. | तत्रैव | : | पृ. ११८. |
| ४७. | तत्रैव | : | पृ. ५७. |
| ४८. | तत्रैव | : | पृ. ७६. |
| ४९. | तत्रैव | : | पृ. १०९. |
| ५०. | तत्रैव | : | पृ. २३९. |